# बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण घटक पुस्तिका



## बालरक्षक - चळवळ माणुसकीची

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.




# बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण घटक पुस्तिका



बालरक्षक – चळवळ माणुसकीची

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण घटक पुस्तिका


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन** : **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. प्रदिपकुमार डांगे (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. राहुल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **मा. डॉ. शोभा खंदारे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **मा. डॉ. कमलादेवी आवटे**
  उपसंचालक, समता विभाग, राज्य शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **मा. वर्षाराणी भोपळे**
  विभागप्रमुख, समता विभाग, राज्य शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन सहाय्य** : **सुजाता सावंत**
  कार्यक्रम अधिकारी, समता विभाग, राज्य शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **अपर्णा शेंडकर**
  अधीक्षक, समता विभाग, राज्य शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : फेब्रुवारी २०२४
- **अर्थसाहाय्य** : समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण घटक पुस्तिका

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रशिक्षणाचे वेळापत्रक | १ |
| १) | बालरक्षक चळवळ | १३ |
| २) | बालकांचे हक्क व सुरक्षितता | २७ |
| ३) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० : 'निपुण भारत मिशन' | ३२ |
| ४) | वयानुरूप प्रवेश व शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी | ४१ |
| ५) | आदर्श (प्रमाणित) संचालन प्रक्रिया<br>SOP (Standard Operating Procedure) | ४६ |

# बालरक्षक सक्षमीकरण (दोन दिवसीय प्रशिक्षण)

## – प्रशिक्षणाचे वेळापत्रक –

| अ. क्र. | वेळ | दिवस पहिला | दिवस दुसरा |
|---|---|---|---|
| १) | १०.०० ते ११.०० | नावनोंदणी, परिचय, परिपाठ, चहापान, पूर्वचाचणी. | प्रथम दिवसाचे अहवाल वाचन, परिपाठ, चहा. |
| | ११.०० ते १२.०० | बालरक्षक सक्षमीकरण– प्रस्तावना, उद्देश, बालरक्षक कार्याचा थोडक्यात आढावा. | वयानुरूप प्रवेश व शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी. |
| | १२.०० ते १२.१५ | चहापान, छोटी सुट्टी. | चहापान, छोटी सुट्टी. |
| २) | १२.१५ ते ०१.१५ | समता विभाग–कामकाज, बालरक्षक चळवळ, संकल्पना, वैशिष्ट्ये, भूमिका इत्यादी. | आदर्श प्रमाणित संचालन प्रक्रिया SOP शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षणसंदर्भात मार्गदर्शन. |
| | ०१.१५ ते ०१.३० | चर्चा प्रश्नोत्तरे | चर्चा प्रश्नोत्तरे |
| | ०१.३० ते ०२.३० | सुट्टी (भोजन) | सुट्टी (भोजन) |
| ३) | ०२.३० ते ०३.३० | बालकांचे हक्क व सुरक्षितता आणि बालरक्षकांची भूमिका | बालरक्षक उत्कृष्ट कामाचे सादरीकरण :<br>१) बालरक्षक जिल्हा समन्वयक/समता विभागप्रमुख<br>२) बालरक्षक – अनुभव कथन<br>३) बालरक्षक – कामकाजाविषयी<br>४) बालरक्षक – कामकाजाविषयी |
| | ०३.३० ते ०३.४५ | चहापान, छोटी सुट्टी | |
| ४) | ०३.४५ ते ०५.०० | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० निपुण भारत मिशन | |
| | ०५.०० ते ०५.३० | उपरोक्त विषयावर चर्चा/प्रश्नोत्तरे. | उत्तर चाचणी प्रशिक्षण अहवाल लेखन. |

# जिल्हास्तरीय बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण घटकसंच

**दिवस : पहिला**

**तासिका : पहिली** **वेळ : १०.०० ते ११.००**

**उद्दिष्टे :** १) नावनोंदणी करणे.

२) प्रशिक्षणाची वातावरण निर्मिती करणे.

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | नावनोंदणी | परिचय, परिपाठ, चहापान, पूर्वचाचणी, साहित्य वाटप. | ६० मि. | सर्व घटकांची पूर्तता करून देतील. | मुद्द्याची पूर्तता करतील. | – |

**दिवस : पहिला**

**तासिका : दुसरी** **वेळ : ११.०० ते १२.००**

**उद्दिष्टे :** १) बालरक्षक चळवळ स्पष्ट करणे.

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | बालरक्षक सक्षमीकरण | प्रस्तावना, उद्देश, कार्य, माहिती | ६० मि. | सर्व घटकांचे स्पष्टीकरण करतील. | सुलभकांच्या कृतीस प्रतिसाद देतील. | चर्चा, कृती, गटकार्य, प्रश्नोत्तरे इ. |

**दिवस : पहिला**

**तासिका : तिसरी** **वेळ : १२.१५ ते ०१.१५**

**उद्दिष्टे :** १) समता विभाग कामकाजाची ओळख करून देणे.

२) बालरक्षक चळवळ संकल्पना, वैशिष्ट्ये व भूमिका स्पष्ट करणे.

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | समता विभाग माहिती, बालरक्षक चळवळ सादरीकरण (समता विभाग) | समता विभाग माहिती | ०५ मि. | समता विभाग रचना व कार्ये यांची माहिती कथन करतील. | – | पीपीटी |

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | समता विभाग माहिती, बालरक्षक चळवळ सादरीकरण (समता विभाग) | २) बालरक्षक चळवळ इतिहास | ०५ मि. | बालरक्षक चळवळीबाबत राज्यात व जिल्ह्यात आजपर्यंत झालेली कार्यवाही स्पष्ट करतील. (संदर्भ – जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम) | अनुभवांची मांडणी करतील. | पीपीटी |
| | | ३) बालरक्षक संकल्पना व वैशिष्ट्ये. | १० मि. | बालरक्षक संकल्पना व बालरक्षकांची वैशिष्ट्ये स्पष्ट करतील तसेच चर्चा घडवून आणतील. | चर्चेत सहभाग घेतील. | पीपीटी |
| | | ४) बालरक्षकांची भूमिका | २० मि. | बालरक्षकांची भूमिका स्पष्ट करतील व त्याचबरोबर चर्चा घडवून आणतील. | चर्चेत सहभाग घेतील. | पीपीटी |
| | | ✲ शाळाबाह्य मूल म्हणजे कोण? | ०५ मि. | शाळाबाह्य मूल म्हणजे कोण? याचे स्पष्टीकरण करतील व त्याचबरोबर शंकांचे निरसन करतील. | प्रश्न विचारून शंकाचे निरसन करून घेतील. | पीपीटी |
| | | ✲ शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण. | ०५ मि. | शाळाबाह्य मुलांचा शोध व करावयाचे सर्वेक्षण याबाबत माहिती सांगतील. | – | पीपीटी |
| | | ✲ मूल शाळाबाह्य होण्याची कारणे व उपाय. | ०५ मि. | मूल शाळाबाह्य होण्याची कारणे व उपाय यासंदर्भात गटचर्चा घेतील. | गटचर्चेत सहभागी होतील. | पीपीटी |
| | | ✲ समारोप | ५ मि. | झालेल्या चर्चेनंतर एकत्रितरीत्या सारांशांची मांडणी करण्यात येईल. त्याचबरोबर शंकांचे समाधान करण्यात येईल. | – | पीपीटी |

# बालकांचे हक्क व सुरक्षितता आणि बालरक्षकांची जबाबदारी

**दिवस : पहिला**

**तासिका : चौथी** **वेळ : ०२.३० ते ०३.३०**

**उद्दिष्टे :** १) बालकांचे हक्क व सुरक्षितता यांविषयी माहिती सांगणे.

२) बालकांचे हक्क, सुरक्षितता यांमधील बालरक्षकाची जबाबदारी स्पष्ट करणे.

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| ३) | बालकांचे हक्क व सुरक्षितता आणि बालरक्षकांची जबाबदारी | १) बालकांच्या हक्काचा इतिहास | १० मि. | बालकांच्या हक्काचा इतिहास पीपीटीच्या मदतीने स्पष्ट करतील. | – | पीपीटी |
| | | २) बालकांच्या हक्कांची गरज | १० मि. | बालकांच्या हक्कांची वर्तमानात काय गरज आहे या संदर्भाने स्पष्टीकरण करतील. | | पीपीटी |
| | | ३) बालकांचा हक्क | १५ मि. | बालकांचे हक्क कोणते? त्यासंदर्भात विवेचन करतील. मुख्य चार प्रकारच्या संदर्भाने गटात चर्चा घडवून आणतील. | गटचर्चेत सहभाग घेतील | पीपीटी |
| | | ४) शाळा स्तरावर बालकांचे हक्क जतन करण्यासाठीचे उपक्रम | १० मि. | बालकांच्या हक्कासंदर्भाने शाळा स्तरावर कोणकोणते उपक्रम घेता येतील त्या संदर्भात चर्चा घडवून आणतील. उपक्रमात कशा स्वरूपाचा सहभाग हवा हे स्पष्ट करतील. | चर्चेत सहभाग घेतील. | पीपीटी |

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ५) बालहक्काच्या रक्षणासाठी बालरक्षकाची भूमिका | १० मि. | बालकांचे हक्क जतन करण्यासाठी शाळा स्तरावर करावयाच्या कार्यवाहीबरोबर बालरक्षक म्हणून आपण कोणती भूमिका घ्यायला हवी हे स्पष्ट करतील. | – | पीपीटी |
| | | ६) समारोप | ०५ मि. | सत्राच्या संदर्भाने प्रशिक्षणार्थींच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करण्यात येईल. | शंका असल्यास प्रश्न विचारतील. | |

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० : निपुण भारत मिशन

**दिवस** : पहिला **वेळ : ०३.४५ ते ०५.००**

**तासिका : पाचवी**

**उद्दिष्टे :** १) निपुण भारत अभियानविषयी माहिती सांगणे.

२) निपुण भारत अभियानात बालरक्षकाची भूमिका स्पष्ट करणे.

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| ४) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० निपुण भारत मिशन | १) निपुण भारत अभियान माहिती. | १० मि. | निपुण भारत अभियान ओळख करून देऊन माहिती सांगतील. | माहिती समजून घेतील व चर्चेत सहभागी होतील. | पीपीटी |
| | | २) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान : गरज व महत्त्व | १० मि. | निपुण भारत अभियान अंमलबजावणी अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यांची गरज व महत्त्व स्पष्ट करतील. | शिक्षक चर्चेत सहभागी होऊन शंका विचारतील | पीपीटी |
| | | ३) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान : संकल्पना व स्वरूप | १० मि. | पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाची संकल्पना स्पष्ट करून त्याचे स्वरूप कसे असावे हे स्पष्ट करतील. | चर्चेत सहभाग घेतील | पीपीटी |
| | | ४) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान : आवश्यकता उपक्रम | २० मि. | प्रारंभिक शिक्षणाचे महत्त्व पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाचे सार्वत्रिक संपादन याविषयी माहिती स्पष्ट करून चर्चात्मक सहभाग घडवून आणतील. | चर्चेत सहभाग घेतील | पीपीटी |




| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ५) निपुण भारत अभियान : बालरक्षक भूमिका | २० मि. | निपुण भारत अभियान अंतर्गत सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी असलेली बालरक्षकाची भूमिका स्पष्ट करतील. या संदर्भात शिक्षकांमध्ये गटचर्चा घडवून आणतील. | गटचर्चेत सहभागी होतील. | पीपीटी |
| | | ६) समारोप | ०५ मि. | सत्राच्या संदर्भाने प्रशिक्षणार्थींच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करण्यात येईल. | – | |

## वयानुरूप प्रवेश व शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी

**(शासन निर्णय : प्रवेश देखरेख समिती, दिनांक २७ जानेवारी, २०२३)**

**दिवस – दुसरा** **वेळ : ११.०० ते १२.००**

**तासिका – दुसरी**

**उद्दिष्टे :** १) वयानुरूप प्रवेशप्रक्रियेबाबत माहिती सांगणे.

२) वयानुरूप प्रवेश व या विद्यार्थ्यांचे समायोजन याबाबत बालरक्षकाची भूमिका स्पष्ट करणे.

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | वयानुरूप प्रवेश व शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी (शासन निर्णय : प्रवेश देखरेख समिती. दिनांक २७ जानेवारी, २०२३) | १) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार व अधिनियम २००९ | १० मि. | RTE-२००९ मधील तरतुदींबाबत स्पष्टीकरण व चर्चा करतील. | शंका विचारतील. | पीपीटी |
| | | २) वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश : संकल्पना | १० मि. | वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश घेण्यास योग्य मूल ही संकल्पना स्पष्ट करतील. | शंका विचारतील व चर्चेत सहभाग घेतील. | पीपीटी |
| | | ३) मुले शाळेत दाखल न होण्याची कारणे व उपाय. | १० मि. | मुले शाळेबाहेर राहण्याची आर्थिक, सामाजिक व इतर कारणे व त्यावरील उपाययोजना या संदर्भाने गटात चर्चा घडवून आणतील. | चर्चेत सहभाग घेतील. | पीपीटी |
| | | ४) वयानुरूप दाखल मूल : समायोजन | १० मि. | मूल समजून घेताना : आवश्यक बाबींचे स्पष्टीकरण करतील व शिक्षकांचा चर्चात्मक सहभाग घेतील. | चर्चेत सहभाग घेतील. | पीपीटी |

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ५) विशेष शिक्षणासाठी सहकार्य व शिकण्याची गती व पद्धती. | १० मि. | विशेष शिक्षणाचे नियोजन व पद्धती याचे स्पष्टीकरण करतील. | शिक्षक शंका विचारतील. | पीपीटी |
| | | ६) वयानुरूप विद्यार्थी व विविध घटकांच्या जबाबदाऱ्या. | १० मि. | शालेय यंत्रणेशी संबंधित सर्व घटक व समित्या यांच्या जबाबदाऱ्या चर्चेतून स्पष्ट करतील. | चर्चेत सहभाग घेतील. | पीपीटी |
| | | ७) समारोप. | | सत्राच्या संदर्भाने प्रशिक्षणार्थींच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करण्यात येईल. | शंकांचे निरसन करून घेतील. | |

## 'मिशन झिरो ड्रॉप आउट' मोहीम सादरीकरण आदर्श (प्रमाणित) संचालन प्रक्रिया (SOP)

### दि. २७ ऑक्टोबर, २०२२ – बालरक्षक ॲप

**दिवस : दुसरा** **वेळ : १२.१५ ते ०१.१५**

**तासिका : तिसरी**

**उद्‌दिष्टे :** १) प्राथ. संचालनालय पत्र दि. २७ ऑक्टोबर, २०२२ बाबत माहिती देणे.
२) बालरक्षक ॲप रचना व कार्ये याबाबत माहिती देणे.

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| २) | 'मिशन झिरो ड्रॉप आउट' मोहीम सादरीकरण आदर्श (प्रमाणित) संचालन प्रक्रिया (SOP) दि. २७ ऑक्टो., २०२२, बालरक्षक ॲप | १) स्थलांतरित बालकांचे प्रकार | ०५ मि. | स्थलांतरित बालकांचे प्रकार स्पष्ट करतील. | – | पीपीटी |
| | | २) सर्वेक्षणाची कार्यपद्धती व मार्गदर्शन : सूचना व प्रतिबंधात्मक उपाय | १५ मि. | सर्वेक्षण करताना करावयाचे नियोजन, त्याबाबत मार्गदर्शक सूचना, तसेच सर्वेक्षणानंतर करावयाचे प्रतिबंधात्मक उपाय पीपीटी च्या मदतीने स्पष्ट करतील. हे करीत असताना गटामध्ये चर्चा घडवून आणतील. | गटचर्चेत सहभाग घेतील. | पीपीटी |
| | | ३) कार्यवाहीची जबाबदारी | ०५ मि. | गाव स्तर ते विभाग स्तर या टप्प्यातील कार्यवाहीची जबाबदारी स्पष्ट करतील. | शंका असल्यास प्रश्न विचारतील. | पीपीटी |
| | | ४) विविध नियंत्रण कक्ष स्थापन करणेबाबत. | १० मि. | विविध नियंत्रण कक्षाची स्थापना, त्यांचे प्रमुख केंद्र, तालुका, जिल्हा आणि विभाग कक्ष रचना यासंदर्भाने माहितीचे स्पष्टीकरण करतील. | चर्चेत सहभाग घेतील | पीपीटी |

| अ.क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ५) प्रपत्र 'अ' आणि 'ब' | १० मि. | प्रपत्र 'अ' आणि 'ब' यामध्ये गाव, तालुका, जिल्हा येथून स्थलांतरित झालेले व स्थलांतर होऊन आलेले विद्यार्थी यांची माहिती संकलन करणेबाबत पीपीटीच्या साहाय्याने स्पष्ट करतील. | शंका असल्यास प्रश्न विचारतील. | पीपीटी |
| | | ६) बालरक्षक ॲप माहिती व वापर | १५ मि. | बालरक्षक ॲप, त्याची रचना, त्यामध्ये भरावयाची माहिती व मोबाईलमध्ये त्याचा करावयाचा वापर याचे प्रात्यक्षिकासह स्पष्टीकरण करतील. | चर्चेत सहभागी होऊन शंका विचारतील. | पीपीटी |
| | | ७) समारोप | | सत्राच्या संदर्भाने प्रशिक्षणार्थींच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करतील. | शंका असल्यास प्रश्न विचारतील. | – |

## माझा जिल्हा व बालरक्षक चळवळ सादरीकरण

**दिवस – दुसरा**

**तासिका – पाचवी ते आठवी** **वेळ : ०२.३० ते ०५.००**

**उद्दिष्टे :** बालरक्षक कार्याचा परिचय करून देणे व इतर बालरक्षकांना मार्गदर्शन करणे.

| अ. क्र. | घटक | उपघटक | वेळ | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| ३) | माझा जिल्हा व बालरक्षक चळवळ सादरीकरण | ३ उत्कृष्ट बालरक्षकांच्या कार्याचे सादरीकरण : | प्रत्येकी ३० मि. | | | पीपीटी |
| | | १) आपल्या क्षेत्रातील समस्यांचा शोध. | ०५ मि. | | | |
| | | २) प्रत्यक्ष केलेली कार्यवाही | १० मि. | | | |
| | | ३) कार्यवाही करत असताना आलेल्या समस्या व उपाययोजना | ०५ मि. | | | |
| | | ४) आजवर केलेल्या कार्यात मिळालेले यश व पुढे सुरू असलेले कामकाज | ०५ मि. | | | |
| | | ५) समारोप व प्रश्नोत्तरे | ०५ मि. | | | |

# १. बालरक्षक चळवळ

**बालरक्षक संकल्पना :**

शासन परिपत्रक दि. ९ जानेवारी, २०१७ मध्ये नमूद केल्यानुसार जी मुले शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर आहेत, त्यांचा शोध घेऊन त्यांना नियमित शाळेत दाखल करून, नियमितपणे शिकते करण्यासाठी शासन व्यवस्थेतील स्वयंप्रेरणेने, झपाट्याने काम करणाऱ्या शासन यंत्रणेतील व्यक्तींमध्ये शिक्षक, पयवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी यांचा समावेश होतो.

बालरक्षक म्हणून कार्य करण्यासाठी तालुका, आदिवासी बहुल केंद्रात, शहरी विभागात काम करण्यासाठी झपाट्याने काम करणाऱ्या व्यक्ती, अधिकारी, शिक्षक यांची निवड करून त्यांना 'बालरक्षक' म्हणून संबोधण्यात यावे असे सुचविले आहे. त्यानुसार संपूर्ण राज्यामध्ये स्वयंप्रेरणेने व संवेदनशीलपणे काम करणाऱ्या शिक्षकांना आपण 'बालरक्षक' म्हणून संबोधत आहोत.

'एक गाव, एक बालरक्षक' मोहिमेअंतर्गत 'बालरक्षक' सध्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम करीत आहेत.

**बालरक्षकांची वैशिष्ट्ये :**

- मुलगी, मुलगा, दिव्यांग, अन्यलिंगी या शरीर प्रकाराच्या पलीकडे प्रत्येक व्यक्ती मानव आहे, यावर विश्वास असणारी व्यक्ती.
- गावातील ० ते १८ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला भयमुक्त वातावरणात, किमान बारावीपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी सतत धडपड करणारी व्यक्ती.
- जात, धर्म, पंथ, वंश, रंग, लिंग, भाषा, प्रांत, वर्ण, भौगोलिकता, श्रमविभागणी इत्यादींबाबत कधीही भेदभाव न करणारी व्यक्ती.
- ज्याच्या विचारात आणि आचरणात प्रेम, विश्वास, सन्मान, समाधान आहे अशी व्यक्ती.
- वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक आणि तर्कसंगत विचार करून समाजातील व्यक्तींचा माणसाकडे माणूस म्हणून बघण्याचा दृष्टिकोन निर्माण करणारी व्यक्ती.
- मानवाला मेंदू आहे, मानवाच्या मुलांना देखील मेंदू आहे, म्हणून प्रत्येक मूल शिकू शकते असा विश्वास असणारी व्यक्ती.
- प्रत्येक बालकास शिक्षणाचा हक्क, मानव म्हणून समाजात विश्वासाने आणि सन्मानाने स्वयंपूर्ण जीवन जगता यावे यासाठी सतत कार्यशील राहणारी व्यक्ती.
- काहीतरी नवीन, वेगळे करून दाखविण्याची उर्मी असणारी व्यक्ती.

- समस्यांच्या मुळापर्यंत जाऊन त्या सोडविण्याची धडपड करण्याची वृत्ती असलेली व्यक्ती.
- चाकोरीच्या पलीकडे जाऊन काहीतरी नवीन विचार व प्रयोग करायला तयार असलेली व्यक्ती.
- बालकांवर प्रेम करणारी व त्यांच्या हक्कांना जपणे आपले कर्तव्य आहे, हे मानणारी व्यक्ती.
- शिक्षण क्षेत्रातील नवीन विचार, नवीन कल्पना, विविध प्रयोग यांचा अभ्यास करणारी व्यक्ती.
- बालकांच्या समस्या व त्यांची कारणे याबाबत अभ्यास करण्याची तयारी असलेली व्यक्ती.
- पालक, शिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच, शासकीय अधिकारी व राजकीय व्यक्ती या साऱ्यांशी आवश्यकतेनुसार सहज संवाद करू शकणारी व्यक्ती.

## बालरक्षकाची भूमिका :

आर. टी. ई. २००९ नुसार प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. त्यानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास शिक्षण मिळवून देणे, बालकांना नियमित शाळेत आणणे व गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करून देणे हे बालरक्षकाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. आजचे अप्रगत मूल उद्याचे शाळाबाह्य बालक असेल आणि असे शाळाबाह्य मूल बालमजुरीकडे वळण्याची दाट शक्यता असते; म्हणून प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले, तर ते शाळाबाह्य होण्याची शक्यता कमी असते यासाठी आपल्याला जाणीवपूर्ण प्रयत्न करणे अगत्याचे ठरते.

आपल्या कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास शाळेत दाखल करणे, टिकविणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे याची खात्री करणे.

वय वर्षे ३ ते १८ वयोगटातील आपल्या सभोवतालचे प्रत्येक मूल अंगणवाडी/शाळा येथे दाखल होणे, दाखल झाल्यावर ते मूल तेथे रमणे-टिकणे व त्यानंतर त्या मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळून त्याचा सर्वांगीण विकास होणे; हे साध्य करणे ही बालरक्षकाची भूमिका असते आणि यासाठीच बालरक्षकांनी अविरत काम करावयाचे असते. हे काम बालरक्षकांनी एकट्याने करणे अपेक्षित नाही. ते सर्वांच्या सहकार्याने म्हणजेच ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती, माता-पालक संघ, शिक्षक-पालक संघ, इतर शिक्षक, अधिकारी, स्वयंसेवी संस्था, मदत करणाऱ्या व्यक्ती या सर्वांच्या सहकार्याने हे काम करणे अपेक्षित आहे. या अर्थाने बालरक्षक हा असा एक महत्त्वाचा दुवा आहे जो बालकांच्या हक्क रक्षणासाठी, शिक्षणासाठी संबंधित सर्व घटकांशी समन्वय साधू शकेल. जनसंपर्क-संवाद व नवीन प्रयोग या माध्यमातून शाळेमध्ये दाखल झालेले प्रत्येक मूल हे किमान वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत शिक्षण घेईल यासाठी बालरक्षकाने प्रयत्न करावयाचे आहेत.

## बालरक्षकाच्या काही प्रातिनिधिक भूमिका पुढीलप्रमाणे :

- शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे-शाळाबाह्य मुलांची ठिकाणे शोधून, जी मुले शाळाबाह्य होण्याची शक्यता आहे त्यांचा शोध घेऊन त्यांची सविस्तर माहिती विविध यंत्रणांच्या व ग्रामस्थांच्या मदतीने मिळविणे.

- सरल प्रणालीतील ड्रॉपबॉक्समधील मुले शोधून त्यांना शाळेत परत दाखल करण्याच्या दृष्टीने शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती यांच्याशी किंवा समस्येनुसार पालकांशी चर्चा करणे व त्यावर उपाययोजना तयार करणे.
- बालकांच्या समस्या जाणून घेणे, त्यांच्या मुळापर्यंत जाऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती स्वतः घेऊन त्याचा लाभ बालकांना मिळवून देणे.
- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यानुसार (आर. टी. ई.–२००९) कलम–३ नुसार दिव्यांग बालकांना, कलम–४ नुसार वयानुरूप दाखल बालकांना, कलम ९ नुसार स्थलांतरित मुलांना, कलम – १४ नुसार अशी बालके ज्यांच्याकडे काही कागदपत्रे नाहीत अशा बालकांना शाळेत प्रवेशित कसे करता येईल याबाबत मुख्याध्यापक–शिक्षक यांच्याशी, शाळा व्यवस्थापन समितीशी चर्चा करून नियोजन करणे.
- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा (आर. टी. ई. २००९) कलम–१५ नुसार निर्धारित अंतिम दिनांकापर्यंत प्रवेश प्रक्रिया चालू ठेवण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांसोबत चर्चा व नियोजन करणे.
- बालकांना शालेय प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शाळापातळीवर नवनवीन प्रयोग, नवीन उपक्रम कसे घेता येतील याबाबत शिक्षकांशी चर्चा करणे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या दृष्टीने नवीन काय करता येईल, काय सुधारणा करता येतील, याबाबतही शिक्षकांशी चर्चा करणे.
- शिक्षक–विद्यार्थी आंतरक्रिया या अधिक प्रभावी कशा होतील, त्यातून बालकांना कसा अधिकाधिक लाभ होईल याबाबत शाळापातळीवर चर्चा करणे, नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे.
- इयत्तानिहाय अध्ययन स्तर प्राप्त होतो आहे, की नाही याचा आढावा घेऊन शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती यांच्याशी याबाबत चर्चा करणे. जर काही समस्या जाणवली, तर मार्ग सुचविणे व एकत्रित नियोजन करणे.
- सर्व दाखल मुलांना शैक्षणिक साहित्य मिळेल याची खात्री करणे.
- आपत्तीजन्य परिस्थितीमध्ये बालकांशी नियमित संपर्क होईल व त्याचे किमान शिक्षण चालू कसे ठेवता येईल याबाबत शिक्षक–मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीसोबत बसून नियोजन करणे.
- शाळेत मुलांना शारीरिक, भावनिकदृष्ट्या सुरक्षित वातावरण मिळावे, शालेय सुरक्षा चोख व बालसुलभ असावी यासाठी परिपूर्ण सोयी–सुविधा करून घेणे. त्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीशी व मुख्याध्यापक–शिक्षक यांच्याशी तसेच स्वयंसेवी संस्थांचा व लोकसहभाग मिळविण्यासाठी चर्चा करून नियोजन करणे.

- (आर. टी. ई. २००९) नुसार शिक्षेस प्रतिबंध कलमाची अंमलबजावणी करणेबाबत सर्वांचे उद्बोधन करणे. पालकांचे होणारे हंगामी किंवा दीर्घकालीन स्थलांतर रोखण्यासाठी काय करता येईल याबाबत चर्चा करणे. योजनांची माहिती देणे, जनसंपर्क व गृहभेटी चालू ठेवणे व स्थलांतर रोखण्याचा प्रयत्न करणे.
- स्थलांतरित होणाऱ्या प्रत्येक बालकाला शिक्षण हमीकार्डे दिली जातील यासाठी शिक्षकांसोबत नियोजन करणे.
- किशोरवयीन बालकांच्या समस्यांबाबत तसेच विकासात्मक गरजांबाबत संवेदनशील असणे, त्याबाबत बालक–पालक व शिक्षक यांना उद्बोधन करणे.
- विविध शासकीय विभाग व त्यांच्या योजना, जनसंपर्क या माध्यमातून बालकांना शाळेत टिकवून व शिकते ठेवताना येणाऱ्या विविध समस्यांवर मार्ग काढणे.
- लोकसहभागातून आवश्यक शैक्षणिक किंवा इतर साधने, सोयी–सुविधा मिळविण्याचा प्रयत्न करणे.
- आपल्या कामातून इतरांना प्रेरणा देणे.

## शाळाबाह्य मुले :

### महाराष्ट्र शिक्षण हक्क अधिनियम २०११ नुसार :

### शाळाबाह्य मुले :

अशी बालके जी वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील असून, ज्या बालकांनी शाळेत कधीच प्रवेश घेतलेला नसेल किंवा शाळेत प्रवेश घेतल्यानंतरही त्याने त्याचे/तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले नाही. तसेच जो शाळेत प्रवेश घेऊनही सातत्याने ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी शाळेत अनुपस्थित आहे.

### अनियमित मुले :

अनियमित मुलांचे दोन प्रकार करता येतील :

१) जे शाळेत नियमित हजर राहत नाहीत; परंतु शाळेच्या परिसरातच (गाव/वॉर्ड) राहतात.

२) जे शाळेत अनियमित असतात आणि कुटुंबासमवेत स्थलांतरित होतात.

इयत्ता पहिली – शाळेत कधीही दाखल न झालेली मुले.

इयत्ता दुसरी – शाळेत दाखल झालेली मात्र अनियमित असलेली मुले.

### स्थलांतरित मुले :

स्थलांतरित मुले म्हणजे अशी मुले, ज्यांनी शाळेत नाव नोंदविले आहे, परंतु त्या शाळेच्या ठिकाणापासून ३० दिवसांपेक्षा जास्त, मात्र एका शैक्षणिक सत्रापेक्षा कमी कालावधीसाठी आपल्या कुटुंबासोबत किंवा इतरांसोबत उदरनिर्वाहासाठी स्थलांतरित होतात.

बालरक्षक म्हणून आपण या तीनही प्रकारची बालके शिक्षणाच्या प्रवाहात येतील, टिकतील व गुणवत्तापूर्ण शिक्षण घेतील यासाठी सर्वांच्या सहकार्याने काम करावयाचे आहे.

## शाळाबाह्य मुले कोठे शोधाल?

### औद्योगिक व शहरी :

- सिग्नलवर/रस्त्यावर भीक मागताना, सिग्नलवर/रस्त्यावर वस्तू विकताना, वर्तमानपत्र विकताना, फुले-लिंबू-मिरच्या, गजरे विकताना.
- गॅरेजमध्ये, छोट्या ठेल्यावर, रस्त्याच्या कडेच्या वडापाव, चहा वगैरेच्या गाड्यांवर कामात दिसणारी, घरगुती कामात मदत करणारी व छोट्या भावंडांना सांभाळण्यासाठी शाळेत येऊ न शकणारी.
- बांधकामाच्या साईटवर, छोट्या वस्त्यांमध्ये राहणारी.
- ज्या वस्त्यांमध्ये वेश्या व्यवसाय चालतो अशा ठिकाणची/या व्यवसायातील पालकांची मुले.
- रस्त्यावर भीक मागणारी, धार्मिक स्थळांच्या टिकाणी भीक मागणारी मुले.
- हॉटेल व्यवसाय, मिठागरे.
- गजबजलेल्या ठिकाणी राहणारी मुले - रेल्वे स्टेशन, बस स्टॉप, बस स्टॅन्ड, बाजार इ.

**शहरी विभाग :** (सदर यादी परिपूर्ण नाही, याव्यतिरिक्तही इतर ठिकाणी शाळाबाह्य मुले असू शकतात.)

**ग्रामीण विभाग :** (सदर यादी परिपूर्ण नाही, याव्यतिरिक्तही इतर ठिकाणी शाळाबाह्य मुले असू शकतात).

काही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा मानवी हस्तक्षेपामुळे (जसे : भूकंप, पूर, महामारी व मानवी हस्तक्षेप-धरणामुळे किंवा काही परियोजनेमुळे होणारे विस्थापन) गावाकडून शहराकडे किंवा शहराकडून गावाकडे स्थलांतरित होणारे.

- वीटभट्टी, ऊसतोडणी, खाणकाम, दगडकाम, रस्त्याची कामे, धरणाची कामे इत्यादी ठिकाणे जेथे हंगामी मजुरीसाठी कुंटुंबे स्थलांतरित होऊन येतात.
- मेंढपाळ, नंदीवाला समाज, लमाण तांडे जे हंगामी स्थलांतरित होतात.
- दुर्गम भागातील वाड्या-वस्त्यांमधील मुले.
- स्वतःच्या किंवा दुसऱ्यांच्या शेतात काम करणारी मुले.

## शाळाबाह्य बालके शोधण्यासाठी कोणाची मदत घ्याल?

शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, माता पालक संघ, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पालक, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी नागरिक, पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, स्वयंसेवी संस्था, तरुण मंडळे, आशाताई इत्यादी.

## मुले शाळाबाह्य/अनियमित होण्याची प्रमुख कारणे व त्यावरील उपाययोजना :

मुले शाळाबाह्य व अनियमित होण्याची अनेक कारणे आहेत. खाली संभाव्य उपाय सुचवले आहेत, मात्र एकाचवेळी यातील अनेक कारणे एकत्रित असू शकतात हे समजून घेणे आवश्यक आहे. तसेच एका बालकासाठी जी उपाययोजना लागू पडेल, तेच उपाय दुसऱ्या त्याच परिस्थितीतील बालकासाठी लागू पडतील असे नाही. उपाय शोधणाऱ्यांनी प्रत्येक बालक, कुटुंब यांची परिस्थिती ही वेगळी असते, हे समजून घेणे आवश्यक आहे. त्याचा/तिचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे, नावीन्यपूर्ण मार्ग शोधणेही आवश्यक आहे, तसेच नावीन्यपूर्ण मार्ग शोधून उपाययोजना करावी लागणार आहे.

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| पालकांची आर्थिक परिस्थिती | • पालकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे बालकाचे पालकांसोबत स्थलांतर होऊ शकते. त्यासाठी चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टिमचा वापर करून मुलांना शाळेत प्रवेशित करणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे. |
| कौटुंबिक कलह, अडचणी, समस्या<br>• आई-वडिलांमधील कलह/विभक्ती<br>• व्यसनाधीनता<br>• एकल पालकत्व<br>• पालक नसून-विस्तारित कुटुंबाकडे पालकत्व<br>• पालक-विद्यार्थी विसंवाद | • पालक भेट, पालकांना समुपदेशन-मार्गदर्शन करणे, आवश्यक तेथे गावातील संबंधित समित्यांची जसे : तंटामुक्ती समिती, महिला सुरक्षा समिती, बालसुरक्षा समिती यांची मदत घेणे.<br>• एकल पालकत्व निभावण्यासाठी मार्गदर्शन करणे. आर्थिक समस्या असल्यास संजय गांधी निराधार योजना, बालसंगोपन योजना याची माहिती देणे व गावातील संबंधित समित्यांच्या सहकार्याने त्याचा लाभ मिळवून देण्याच्या प्रयत्न करणे.<br>• नातेवाईकांकडे वाढत असलेल्या पालकविना बालकांसाठीही जर आर्थिक गरज असेल, तर बालसंगोपन योजनेबाबत त्यांना माहिती देणे व गावातील संबंधित समित्यांच्या सहकार्याने लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.<br>• सुजाण पालकत्व याबाबत समुपदेशन करणे, सर्व पालकांसाठी विद्यार्थी-पालक संबंध याबाबत उद्बोधन घेणे. यासाठी गावातील अंगणवाडी सेविका व आशा कार्यकर्तींची मदत घेणे.<br>• कौटुंबिक कलहात जर बालकावर अत्याचार होत असतील किंवा कलहाचे कारण बालकाचे शोषण व अत्याचार असेल, तर प्रथमतः बालकाला सुरक्षित करणे हे आपले काम असेल. त्यासाठी बालसंरक्षण समिती, पोलीस किंवा चाईल्ड हेल्प लाईनची मदत घेता येईल. |

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| पालकांचे स्थलांतर | **पालकांच्या स्थलांतरामुळे आपल्या आसपास दाखल झालेल्या बालकांबाबत :**<br>• स्थलांतरित बालकांसाठी गावातच हंगामी वसतिगृह तयार करून बालकांचे स्थलांतर थांबवावे.<br>• स्थलांतर होऊन ज्या शालेय परिसरात बालके जातील त्या शाळेत जाऊन शिक्षण द्यावे.<br>• प्रत्येक बालकाला मूळच्या शाळेच्या ठिकाणी शिक्षण हमीकार्ड द्यावे. शिक्षण हमीकार्डावरून शाळेत बालकाने प्राप्त केलेल्या विषयनिहाय क्षमता, मूळच्या शाळेचा यु-डायस कोड, शाळेचे नाव, मुख्याध्यांपकाचे नाव, याचे रजिस्टर क्रमांक असल्यामुळे स्थलांतरानंतर ज्या शाळेत बालक प्रवेशित होईल तेथील शिक्षक/मुख्याध्यापक यांना बालकाची संपूर्ण माहिती मिळेल व बालकाला पुढील क्षमता प्राप्त करण्यासाठी साहाय्य करता येईल.<br>• जी बालके स्थलांतरित होऊन आपल्या कार्यक्षेत्रात आली आहेत, प्रथमतः त्यांची संपूर्ण माहिती घेणे/ती शोधून काढणे आवश्यक आहे.<br>• जेथून स्थलांतरित झाली, तेथील शाळेत ती दाखल असतील, तर त्यांच्याकडे शिक्षण हमीकार्ड आहे का, याची चौकशी करावी. नसेल तर मूळ शाळेतील शिक्षकांसोबत संपर्क करून ई-मेल/व्हॉट्सॲप वर त्यांच्याकडून माहिती घ्यावी आवश्यक ती कागदपत्रे मिळविण्याचा प्रयत्न करावा.<br>• त्यानंतर त्यांचे स्थानिक शाळेत समायोजन करावे, की त्यांच्या कामाच्या जागी शिक्षणाचे नियोजन करता येईल, याबाबत शाळेतील शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, कामाच्या ठिकाणचे व्यवस्थापन, स्थानिक ग्रामपंचायत इ. यांच्याशी चर्चा करून निर्णय घेणे. शाळेतील शिक्षक, व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्याने आवश्यक शैक्षणिक साहित्याची जमवाजमव करणे. (शाळेतील उर्वरित, ग्रामस्थ व आसपासच्या दानशूर व्यक्ती/संस्था/कंपन्या यांच्या माध्यमातून.)<br>• जर बालके शाळेत येऊन शिक्षण घेणार असतील, तर आवश्यक असेल तेथे परिवहन सेवा यंत्रणेच्या सहकार्याने किंवा इतर शिक्षक-अधिकारी यांच्याशी विचारविनिमय करून त्यांच्या येण्या-जाण्याची सोय करण्याचा प्रयत्न करणे. |

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| पालकांचे स्थलांतर | • जर त्यांच्या निवासाच्या जागीच तात्पुरती शिक्षणाची सोय करावी लागणार असेल, तर शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व इतर शिक्षक यांच्या सहकार्याने शिक्षक/स्वयंसेवक यांची नियुक्ती करणे/देखरेखीची व बालकांचा शैक्षणिक विकास होत आहे की नाही याचा आढावा घेणे व कार्यपद्धतीत आवश्यक बदल सुचवणे.<br>• पुनः स्थलांतर होऊन जेव्हा मूळ गावी बालके परततील, तेव्हा ती मूळ शाळेत जाऊ लागतील याची खात्री करण्यासाठी त्या ठिकाणचे शिक्षक व शिक्षण विभागाशी संवाद साधणे.<br>• हे कामकाज करतानाच पालक व बालक यांच्या आरोग्य किंवा मूलभूत गरजा यांविषयी काही समस्या जाणवल्या, तर प्राधान्याने गावातील इतर व्यवस्थांच्या व विभागांच्या मदतीने त्यांना साहाय्य पुरविणे.<br>• बालकांचा खाऊ, पोषण आहार, शैक्षणिक साहित्य अशा गरजा दानशूर व्यक्ती/संस्था यांची मदत घेऊन पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.<br>• कामकाज करताना बालशोषण, बालकामगारी, बालअत्याचार किंवा बालविवाह सारख्या बालकांबाबतीतील काही समस्या आढळल्यास त्याबाबत जाणीव जागृती करणे व अत्याचाराची माहिती गाव/तालुका बालसुरक्षा समिती/बाल पोलीस अधिकारी/बालकल्याण समिती किंवा चाईल्ड हेल्पलाईन यांना देणे. अशा बालकांना मदत मिळवून देणे.<br>**पालकांच्या स्थलांतरामुळे आपल्या शाळांतून दुसऱ्या ठिकाणी गेलेल्या बालकांबाबत :**<br>• स्थलांतर रोखण्याचा प्रयत्न करावा, याबाबत पालकांचे समुपदेशन करावे. नियमित स्थलांतरित होणाऱ्या पालकांच्या हंगामी कामासाठी काही पर्याय करता येऊ शकतात का? याबाबत ग्रामपंचायत, गाव बालसंरक्षण समिती यांच्याशी चर्चा करावी. किमान बालकांनी पालकांसोबत स्थलांतर करू नये यासाठी काही उपाय करता येतात का? याचा तपास करावा. हंगामी वसतिगृहांची सोय करता येते का? बालगृह, कस्तुरबा गांधी बालिकाश्रम, आश्रमशाळा येथे हंगामी निवासाची सोय करता येऊ शकते का? याचा सर्वांसोबत आढावा घ्यावा. |

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| पालकांचे स्थलांतर | • सर्व उपाय करूनही जर स्थलांतर टाळू शकलो नाही, तर किमान स्थलांतरित होणाऱ्या प्रत्येक बालकासाठी शिक्षण हमीकार्ड द्यावे, त्यास/त्याच्या पालकास आपला संपर्क क्रमांक द्यावा, पालकांचा संपर्क क्रमांक घ्यावा, कामाच्या ठिकाणचा–ठेकेदाराचा संपर्क क्रमांक घ्यावा. बालकांना शिक्षण हमीकार्ड द्यावे.<br>• अशा पालकांच्या/बालकांच्या किमान आठवड्यातून एक वेळा संपर्कात रहावे.<br>• बालक–पालकांना शैक्षणिक किंवा बालसुरक्षेबाबत काही अडचणी आल्यास समस्येनुसार आवश्यक ती मदत करावी, त्यासाठी इतर शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांचे सहकार्य घ्यावे.<br>या कारणांमुळे मूल शाळाबाह्य होत असेल, तर वरील उपाययोजना करता येतील. |
| कौटुंबिक जबाबदाऱ्या :<br>• लहान भावंडांचा सांभाळ.<br>• घरगुती कामाची जबाबदारी. | **पालकांचे समुपदेशन :**<br>• महिला व बालकल्याण विभागाच्या सहकार्याने बालवाडी, अंगणवाडी, पाळणाघर यांची सोय करता येते का, याचा अंदाज घेणे. जर तशी सोय असेल, तर बालवाडीताई व शिक्षकांच्या मदतीने बालकांना बालवाडीत किंवा शाळेत दाखल करणेबाबत पालकांचे समुपदेशन करणे.<br>• शैक्षणिक समायोजन करून बालके त्यांच्या लहान भावंडांसह शाळेत येऊ शकतील का, याचा शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासोबत चर्चा करून अंदाज घेणे. सर्वांनी मिळून शक्य झाल्यास तसे नियोजन करणे.<br>• पालकांशी बोलून घरगुती कामाच्या जबाबदाऱ्या कमी करता येतील का, त्यांच्या वेळा शालेय वेळेव्यतिरिक्त ठेवता येतील का, याबाबत चर्चा व त्यानुसार नियोजन करणे. अन्यथा मुलांना सोयीच्या वेळेत शिक्षणाची व्यवस्था करणे. |
| शाळा व घर यातील अंतर | • परिवहन व्यवस्था, मदतनीस व्यवस्था, सायकलची सोय इत्यादींपैकी काय सोय करता येईल याबाबत मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती यांच्यासोबत विचारविनिमय करणे.<br>• घराजवळच्या किंवा येण्या–जाण्याच्या दृष्टीने सोयीच्या शाळेत पर्यायी प्रवेश देता येऊ शकेल का, याचा अंदाज सदर शाळेच्या शिक्षक व मुख्याध्यापकांशी चर्चा करून घेणे व त्यानुसार नियोजन करणे.<br>• अंतर पार करणे नैसर्गिक/भौगोलिक परिस्थितीमुळे अशक्य असल्यास मुलांच्या निवासाच्या ठिकाणी शिक्षणाची सोय करण्यासाठी वरील मुद्दा–१ मध्ये सांगितलेले मार्ग अवलंबणे. |

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| बालसुरक्षा विषयक समस्या :<br>उदा., शारीरिक शोषण, बालविवाह, भावनिक शोषण इत्यादी. | • पालकांशी चर्चा करणे व त्याचे समुपदेशन करणे.<br>• समस्या काय आहे याची प्रथम नीट माहिती घेणे. त्यासाठी बालक, पालक, इतर वस्ती सदस्य यांच्याशी चर्चा करणे.<br>• समस्येचा नीट अभ्यास करणे व त्याबाबत काय करता येईल याबाबत संबंधित सर्वांची मते व विचार जाणून घेणे.<br>• गाव बालसंरक्षण समिती, महिला दक्षता समिती, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा सुरक्षा समिती, पोलीस, बालकल्याण समिती यांची मदत घेऊन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे.<br>• बालकाला समस्यामुक्त केल्यानंतर मानसिक, भावनिक आधार देणे व शिक्षणाशी परत जुळवून घेण्यास मदत करणे.<br>• बालक किंवा पालकांच्या समस्येबाबत गोपनीयता बाळगणे. बालकाला त्यावरून कोणी हिणवणार नाही, दूषणे लावणार नाही, पूर्वग्रहपूर्वक वागणूक देणार नाही यासाठी गरज वाटल्यास शिक्षक, विद्यार्थी व पालकांशी गोपनीयता पाळणे का आवश्यक आहे याबाबत चर्चा करणे.<br>• बालसुरक्षा संदर्भात शालेय स्तरावर उपक्रमांचे आयोजन करणे. |
| दिव्यांग बालके | • शिक्षण विभाग व अपंग कल्याण विभागाच्या सहकार्याने विशेष मुलांसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.<br>उदा. विशेष शैक्षणिक साहित्य, मदतनीस भत्ता, विशेष शिक्षकांचे मार्गदर्शन इ.<br>• विशेष साधनव्यक्ती व समावेशित शिक्षक जिल्हा समन्वयक यांच्या सल्ल्यानुसार शिक्षण चालू ठेवण्याबाबत शिक्षकांशी चर्चा करणे.<br>• इतर बालके सदर बालकाला त्यांच्यात सामील करून घेतील याची खात्री करणे.<br>• सदर बालकाला शाळेत वावरणे सोपे जावे यासाठी आवश्यक बदल करणेबाबत शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याशी चर्चा करणे व सोयी करून घेण्याचा प्रयत्न करणे. आवश्यक असल्यास स्वयंसेवी संस्था व व्यक्तींची मदत घेणे–जसे : खास स्वच्छतागृह, रॅम्प, बाकाऐवजी खुर्चीची व्यवस्था इ.<br>• विशेष साधनव्यक्ती व समावेशित शिक्षक जिल्हा समन्वयक यांच्या मदतीने अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यास मदत करणे.<br>• वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत मिळेल यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करणे.<br>• आवश्यक वाटल्यास अपंग मंत्रालयांतर्गत चालवल्या जाणाऱ्या विशेष शाळांमध्ये, निवासी शाळांमध्ये, कार्यशाळांमध्ये प्रवेश मिळवून देण्याबाबत चर्चा करणे. |

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| बालकामधील न्यूनगंड | • न्यूनगंडाचे कारण समजून घेणे.<br>• बालकाला ज्या गोष्टी उत्तम प्रकारे करता येतात त्या कृती सर्व बालकांसोबत करून घेणे. बालकांमधील बलस्थाने ओळखून त्यांना प्रेरणा देऊन आत्मविश्वास निर्माण करणे व शालेय प्रवाहात टिकवून ठेवणे.<br>• या बालकांना इतर बालकांसोबतच सहशालेय उपक्रमात सहभागी करून घेणे. बालकांना प्रोत्साहन देणे, प्रेमाने वागवणे. |
| बालविवाह | • बालविवाहाबाबत माहिती मिळाल्यास बालविवाह प्रतिबंध अधिकारी, गाव बालसुरक्षा समिती, पोलीस, चाईल्ड हेल्पलाईन किंवा बालकल्याण समिती यांना खबर देणे, बालकाला मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करणे. |
| बालकामगार | • कायद्यानुसार बालक ज्या कामात गुंतले आहे, ते बालमजुरीच्या व्याख्येत मोडते का? याचा अभ्यास करावा. असे असल्यास संबंधित यंत्रणांना खबर देणे.<br>• जर बालकामगार अधिनियम २०१६ नुसार सदर बालकाची व्याख्या बालमजूर म्हणून करता येत नसेल, तरीही बाल न्याय काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ कलम ७५, ७९ नुसार कार्यवाही होऊ शकते याचे भान ठेवून पोलीस, चाईल्ड लाईन किंवा बालकल्याण समितीची मदत घेऊन बालकांना मजुरी कामातून मुक्त करून शिक्षणप्रवाहात आणण्याचा प्रयत्न करणे.<br>• शाळेत बालकांकडे असलेल्या व्यवसायाच्या ज्ञानाचा आदर केला जाईल, त्याचा संदर्भ घेतला जाईल. यासाठी शिक्षकांच्या मदतीने नियोजन करणे.<br>• बालकाला वयानुरूप इयत्तेत दाखल करणे व अभ्यासक्रम त्यानुसार पूर्ण करून घेण्यासाठी शिक्षकांसोबत नियोजन करणे. |
| शालेय वातावरणामुळे बालक शाळेत न रमणे. | • शिक्षक – विद्यार्थी यांच्यामध्ये मोकळा संवाद असेल, शाळेत खेळीमेळीचे, मोकळे व आनंददायी वातावरण ठेवणे.<br>• सहभागी–बालकेंद्री शिक्षण, आनंददायी शिक्षण यांचे नियोजन करणे.<br>• बालकांची अभ्यास/काही विषय याबाबतची भीती घालविण्यासाठी त्याला/तिला समुपदेशन.<br>• बालकाच्या स्वतःच्या गतीने त्याला/तिला शिक्षण घेता येईल व त्यासाठी इतर मुले/शिक्षक साहाय्य करतील यासाठी विविध पद्धतींचा वापर करणे. (ई–लर्निंग, सहाध्यायी शिक्षण, ज्ञानरचनावाद, गट पद्धती.) |

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| शालेय वातावरणामुळे बालक शाळेत न रमणे. | • बालकाला जर एखाद्या विषयात कमी गती असेल, तर त्यासाठी उपाययोजना करणे.<br>• मुलांच्या कला-गुणांना प्रोत्साहन मिळेल यासाठी प्रत्येक मुलाचा सहभाग होईल अशा रीतीने उपक्रमांचे आयोजन करणे.<br>• शाळेत बालकाला शारीरिक किंवा मानसिक क्षती पोहोचविणारी शिक्षा करण्यास बंदी आहे, याबाबत सर्व शिक्षक व मुलांना माहिती देणे.<br>• शाळेत सूचनापेटी असावी व ती नियमित वापरली जावी यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावे, ती नियमित उघडली जावी व त्यातील सूचनांचा गांभीर्याने विचार व्हावा यासाठी सर्वांनी मिळून नियोजन करणे.<br>• बालकाला शाळेतील एखाद्या विशिष्ट जागेची, व्यक्तीची भीती वाटत असेल तर त्याचे मूळ शोधण्याचा प्रयत्न करणे, याबाबत शिक्षकांशी चर्चा करणे. अशा वेळी बालकाला थोडी सूट देण्याबाबत विचारविनिमय करणे.<br>• नवीन दाखल बालकाचे शिक्षक व इतर बालके स्वागत करतील, त्याला/तिला समाविष्ट करून घेतील, मैत्री करतील व शाळेत रूळायला मदत करतील. यासाठी आधीच्या बालकांशी चर्चा करून आश्वासक वातावरण निर्मिती करणे.<br>• शालेय बालगट, स्काऊट गाईड, खेळ, मीना-राजू मंच इत्यादी उपक्रमांमध्ये बालकांना सहभागी करून घ्यावे. |
| पालकांची शिक्षणविषयक अनास्था | • शिक्षणाचे फायदे काय आहेत ते पालक व मुलांना कसे समजावून देता येतील, याबाबत शिक्षकांशी चर्चा करणे. मुख्यतः शिक्षण हे स्वतःच्या पायावर उभे रहाण्यासाठी, पैसे कमविण्यासाठी इ. कारणे न देता. शिक्षित व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात होणाऱ्या बदलांबाबत जास्त बोलणे गरजेचे आहे, हे लक्षात घेणे. जसे - आत्मविश्वास वाढणे, फसवणूक न होणे, कोणत्याही कठीण प्रसंगाचा सामना करण्याची ताकद असणे व अशाप्रसंगी कोणी गैरफायदा घेणार नाही असा आत्मविश्वास निर्माण होणे, चांगले-वाईट समजणे, चांगल्या-वाईट व्यक्ती ओळखता येणे, कामाची नवी दिशा मिळणे/नावीन्यपूर्ण काम करण्याची प्रेरणा मिळणे इ. बाबींचा उल्लेख करावा. शिक्षित माणसाचे जगणे व अशिक्षित माणसाचे जगणे यात कसा फरक असतो याबाबत बोलावे. यातूनच शिक्षणाबाबत आस्था वाटू शकते. |

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| पालकांची शिक्षणविषयक अनास्था | • वरील मुद्द्यांना घेऊन पालकांशी, मुलांशी व ग्रामस्थांशी चर्चा करणे.<br>• शालेय शिक्षणासोबतच परिसरातील नावीन्यपूर्ण व्यावसायिक प्रयोग मुलांना दाखवावे/सांगावे. मुलांना स्वतः शाळेत व्यावसायिक प्रयोग करायला वाव देणे व हेच प्रयोग घरी करण्यास प्रोत्साहन देणे. जसे : रोपवाटिका तयार करणे, गांडूळखत तयार करणे इत्यादी. |
| पालकांच्या अवास्तव अपेक्षा | • पालक प्रबोधन, समुपदेशन.<br>• पालक व बालक यांच्यामध्ये सहज संवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.<br>• विद्यार्थ्यांच्या स्व-जाणिवा विकसित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी त्यांच्यासोबत आत्मभान व आत्मजागृतीच्या अनुषंगाने कोणकोणत्या कृती घेता येतील, याबाबत शिक्षकांशी चर्चा करणे व नियोजन करणे.<br>• बालकाने आनंदी रहाणे, आत्मविश्वासाने वावरणे, स्वतःच्या आवडीनुसार मार्ग निवडणे व त्यात यश मिळविणे हे त्याच्या केवळ परीक्षेतील यशापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे, याबाबत जाणीवजागृती करणे. |
| बालकांच्या भाषिक समस्या | • स्थानिक भाषा बोलणाऱ्या मुलांसाठी काय नियोजन करावे याबाबत शिक्षकांशी चर्चा करणे जसे : शिक्षकांनी मुलांच्या बोलीभाषेतील मुख्य संवादासाठी आवश्यक शब्दांचा अभ्यास करावा, त्यांच्याशी त्यांची भाषा व प्रमाणभाषा असा मिश्र संवाद साधावा. मुलांना त्यांच्या भाषेत उत्तरे देण्याची, व्यक्त होण्याची मुभा द्यावी, हळूहळू प्रमाणभाषेकडे न्यावे. मुलांच्या मदतीने प्रमाणभाषा व मुलांची बोलीभाषा असा सामान्य शब्दांचा शब्दकोश तयार करावा व तो मुलांना वापरण्याची सवय लावावी. शब्दकोश हा चार्ट, पोस्टर सारखाही लावून ठेवता येईल.<br>• परराज्यातील भाषा मातृभाषा असून त्याच भाषेत संवाद साधता येत असेल तर मात्र त्यांच्या भाषेतून त्यांना शिकवू शकेल असा त्यांच्यापैकी एक शिक्षक स्वयंसेवक शोधावा. त्यासाठी ग्रामस्थांचे सहकार्य घेणे. त्याला/तिला मार्गदर्शन करावे व मुलाचे गणित व किमान भाषा लेखन-वाचन चालू राहील याची काळजी घ्यावी. त्यांना त्यांच्या भाषेतील शैक्षणिक साहित्य, क्रमिक पुस्तके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणे. |

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| शालेय भौतिक सुविधांचा अभाव | • सुरक्षित इमारत, पुरेसे पाणी व स्वच्छतागृह यांच्या सोई असणे, वीजेची सोय असणे अत्यंत आवश्यक आहे, त्यासाठी सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ यांच्या मदतीने प्रयत्न करणे. |
| किशोरवयीन मुलींची सुरक्षितता | **याची अनेक कारणे असू शकतात :**<br>• महिलांसाठी स्वच्छतागृह व पाणी याची व्यवस्था उपलब्ध करणे.<br>• ठरावीक वयातील मुलींना मासिक पाळीबाबत, मासिक पाळीच्या वेळी पाळावयाच्या स्वच्छेतेबाबत, याबाबतच्या अंधश्रद्धांबाबत माहिती देणे. त्यासाठी आशा कार्यकर्ती किंवा आरोग्य अधिकाऱ्यांची मदत घेणे.<br>• वयात आलेल्या मुलींना स्वयं-सुरक्षेचे नियम शिकविणे. शालेय परिवहन समितीच्या बैठकांचे आयोजन करणे. |

# २. बालकांचे हक्क व सुरक्षितता

## प्रास्ताविक :

बालकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे याकरिता संयुक्त राष्ट्र संघाने सन १९८९ मध्ये बालहक्कांसंदर्भात बालहक्क संहिता स्वीकारली असून, त्याद्वारे सर्व बालकांना मूलभूत मानवी हक्क मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे, जसे : जीविताचा अधिकार, शारीरिक आणि बौद्धिक सुप्त गुणांचा विकास करण्याचा अधिकार, त्यांच्या विकासावर घातक परिणाम होईल अशा प्रभावांपासून संरक्षणाचा अधिकार, तसेच कौटुंबिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार इत्यादी. बालकांचे हक्क हे विशेष मानवी हक्क आहेत, जे १८ वर्षांखालील सर्व व्यक्तींना लागू आहेत. व्यक्तीची जात, धर्म, वंश, लिंग, रंग, भाषा आणि संपत्ती इत्यादींचा विचार न करता सर्व बालकांना हक्क मिळवून देणे हे बालहक्क संहितेनुसार क्रमप्राप्त आहे. बालकांना विकासाची संधी मिळावी म्हणून प्रत्येक बालकाला कोणकोणत्या गोष्टी मिळाव्यात आणि कोणत्या गोष्टी बालकांसाठी टाळायला हव्यात हे बालहक्कांच्या स्वरूपात मांडले आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने १९७९ ते १९८९ अशी १० वर्षे वेगवेगळ्या राष्ट्रातील मुलांच्या स्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत दिनांक २० नोव्हेंबर, १९८९ रोजी बालअधिकार संहितेला मान्यता दिली गेली आणि म्हणून त्या दिवसापासून सर्व जगात २० नोव्हेंबर हा दिवस 'बाल अधिकार दिवस' म्हणून ओळखला जातो.

भारत सरकारने बाल अधिकार संहितेला मान्यता देण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी घेतला. या तीन वर्षांत अनेक मुद्द्यांवर भूमिका घेताना त्याचे परिणाम काय होतील याचा विचार करण्यात आला. अखेर दिनांक ११ डिसेंबर, १९९२ रोजी बाल अधिकार संहितेला मान्यता दिली आणि भारत हा बाल अधिकार संहिता मानणारा देश ठरला. ही संहिता १९६ देशांनी मान्य केली. महाराष्ट्रात बालकांच्या हक्कांचे संरक्षण, प्रचलन आणि रक्षण करण्यासाठी बालहक्क संरक्षण कायदा २००५ (२००६ मधील ४) अन्वये जुलै २००७ मध्ये महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. हे स्वायत्त मंडळ म्हणून राज्यात काम करीत आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ५४ कलमांच्या बाल अधिकार संहितेला भारत सरकारने मान्यता दिली. या ५४ कलमांपैकी...

- १ ते ४२ या कलमांमध्ये बालकांचे निव्वळ अधिकार आहेत.
- ४३ ते ५४ कलमे मुलांचे अधिकार अबाधित रहावेत म्हणून त्या त्या राष्ट्रांनी काय करावे हे सांगणारी आहेत.

➢ **या ५४ कलमांची तीन आधारभूत तत्त्वे आहेत.**

**भेदभावाला नकार :** प्रत्येक मुलाला जात, धर्म, वंश, लिंग, रंग, भाषा आणि संपत्ती, पालकांची राजकीय मते, आईवडील व पालकांची मते, श्रद्धा यांमुळे भेदभाव न होता त्यांचे हक्क मिळाले पाहिजेत.

**मुलांचे हित प्रथम :** खाजगी आणि सरकारी संस्था, न्यायालये, शासकीय अधिकारी मुलांबाबत निर्णय घेताना सर्वप्रथम मुलांचे हक्क पाहतील.

**मुलांचा सहभाग :** बालकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी त्यांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत सहभागाचा हक्क मिळण्याची गरज आहे.

बालहक्कांचे प्रामुख्याने चार व्यापक वर्गांत वर्गीकरण केले आहे. यामध्ये बालकांचे सर्व नागरी, राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्क यांचा समावेश होतो.

## बालकांचे हक्क




**: जगण्याचा अधिकार :**
- जन्म घेण्याचा, जगण्याचा
- आहार आणि लसीकरणाचा
- आरोग्य सुविधा आणि शुद्ध पाणी मिळण्याचा

**: विकासाचा अधिकार :**
- शिक्षणाचा अधिकार
- खेळण्याचा अधिकार
- कौशल्य शिक्षणाचा अधिकार

**: सहभागाचा अधिकार :**
- मत मांडण्याचा अधिकार
- म्हणणे ऐकून घेण्याचा अधिकार

**: संरक्षणाचा अधिकार :**
- अत्याचार
- हिंसा
- गुंडगिरी अथवा दादागिरी
- बालमजुरी
- बालविवाह
- व्यसन
- ऑनलाईन अत्याचार यांपासून सुरक्षा

## बालकांच्या हक्कांच्या संदर्भात बालरक्षकांची भूमिका :

### १) बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ :

- ज्या बालकांच्या हातून गुन्हा घडलेला आहे, अशा बालकांच्या संरक्षणासाठी सामाजिक पुनर्वसनाची प्रक्रिया राबविण्यात यावी; यासाठी सदर कायद्याची निर्मिती करण्यात आली.
- ज्या बालकांना संरक्षणाची गरज आहे अशा बालकांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी जिल्हा स्तरावर बाल कल्याण समिती आहे.
- आपल्या जिल्ह्यातील बाल कल्याण समिती, बालकांच्या हिताचे निर्णय घेण्यास सक्षम आहे. त्यांना बालकांची काळजी व संरक्षण तसेच त्यांच्या पुनर्वसनासाठी निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आहेत.
- शाळेच्या आवारात एखाद्या बालकाच्या हातून गंभीर गुन्हा घडला असेल, तर त्वरित आपल्या वरिष्ठांना सांगून त्याच्या पालकांना कळवावे. गावातील पोलीस पाटलांच्या मदतीने पोलिसांना खबर द्यावी.

### २) बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ (POCSO)

#### जर अपराध शाळेत घडल्यास :

- बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण आणि गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी कायद्याची निर्मिती.
- या कायद्यानुसार संस्थात्मक अथवा बालकांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या व्यक्तीकडून अपराध घडल्यास तो गंभीर अपराध मानला जाईल.
- बालकांना धीर द्या, 'यात तुझी काही चूक नाही' हा विश्वास द्या.
- अपराधी कितीही जवळचा असला, तरी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करा आणि त्यांना सदर घटना सविस्तर सांगा.
- वरिष्ठांनी त्याबाबत योग्य कार्यवाही केली आहे याची खात्री करा.

### ३) बालविवाह प्रतिबंध कायदा – २०१६ :

- सदर कायद्यानुसार मुलाचे विवाहयोग्य वय २१ वर्षे पूर्ण व मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण निर्धारित केलेले आहे. या निर्धारित वयाच्या अगोदर विवाह झाल्यास बालविवाह समजला जातो.
- बालविवाह लावण्यास कारणीभूत सर्व व्यक्ती कायद्याने शिक्षेस पात्र.
- ग्रामसेवक हा विवाह प्रतिबंध अधिकारी व अंगणवाडी सेविका सहायक असतात.
- तक्रार करण्यासाठी पोलीस, चाईल्ड हेल्पलाईन, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बाल कल्याण समिती जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

## ४) बालकामगार (प्रतिबंध व नियमन) सुधारित कायदा - २०१६ :

- मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी मुलांनी शाळेत असणे आवश्यक आहे, कामाच्या ठिकाणी नाही.
- गरिबी हे मुलांनी काम करण्यामागचे एकमेव कारण नाही.
- भारतात ५ ते १४ वर्षे वयोगटातील १ कोटी १० लाख मुले बालकामगार म्हणून काम करीत आहेत. खालील ठिकाणी यासंदर्भात तक्रार करू शकता.
    - चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक - १०९८
    - जिल्हा कामगार अधिकारी
    - पोलीस - १००
    - बालकामगार प्रथा विरोधी कृतिदल
    - बाल जिल्हा संरक्षण कक्ष
    - बाल कल्याण समिती
    - जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

## ५) माहिती व तंत्रज्ञान सुधारित कायदा - २००८ :

- इंटरनेटवरून अश्लील गोष्टी, अश्लील मजकूर प्रसारित करणे, खाजगी अवयवांचे फोटो, फेक प्रोफाईल, एखाद्या व्यक्तीला बदनाम करण्यासाठी बदनामीकारक शब्द वापरणे तसेच हॅकिंग करणे, सायबर दहशत यांबाबत मुले अथवा त्यांचे पालक आजही मोकळेपणाने तक्रार करताना दिसून येत नाहीत. यांबाबत शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी जनजागृती करावी.
- विविध संकेतस्थळे व सामाजिक ॲपमध्ये सुरक्षेचे उपाय दिलेले असतात, त्यांचे अनुकरण करावे.

## ६) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम - २००९ :

- ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा बालकांचा मूलभूत अधिकार आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण द्यावे.
- प्रत्येक बालकास शाळेत आणणे, टिकविणे त्यास गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देणे.
- वयानुरूप इयत्तेत प्रवेश देऊन विशेष शिक्षणाद्वारे त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण व्हावे म्हणून प्रयत्न करणे.
- बालकांस कोणतीही शारीरिक व मानसिक शिक्षा होणार नाही याची काळजी घेणे.

## बालकांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात मानवी घटक

- मुख्याध्यापक → शिक्षक → विद्यार्थी → पालक → कार्यालयीन कर्मचारी → मीना–राजू मंच
- शाळा व्यवस्थापन समिती → माता पालक संघ → पालक–शिक्षक संघ → परिवहन समिती
- बालसंरक्षण समिती → पोलीस अधिकारी → बाल कल्याण समिती → बाल कल्याण पोलिस अधिकारी (CWPO)

उपरोक्त शाळा व शाळेशी संबंधित मानवी घटकांनी बालकांच्या विविध पातळ्यांवरील सुरक्षिततेचा विचार करायला हवा.

### विद्यार्थी सुरक्षेमध्ये बालरक्षकाची भूमिका :

१) शाळा व्यवस्थापन समितीच्या होणाऱ्या बैठकीत विद्यार्थ्यांचे हक्क व सुरक्षितता याबाबत चर्चा करावी.

२) बालकांच्या वाहतूक नियमांची अंमलबजावणी करावी.

३) शाळेतील मध्यान्ह भोजन तयार होणाऱ्या किचन शेडची वेळोवेळी पाहणी करावी. स्वच्छता, आरोग्य व अन्नाचा दर्जा यांबाबत आढावा घेऊन उपाययोजना करावी.

४) विद्यार्थ्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी प्रयत्न करावेत. या कामी बालरक्षक, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत यांची मदत घ्यावी.

५) शाळा इमारतीची सुरक्षितता धोक्यात असेल, तर शाळा व्यवस्थापन समिती सभेत ठराव मांडून तो मंजूर करून घेऊन, त्यासंबंधी सातत्याने पाठपुरावा करावा.

६) बालकांच्या खेळण्याची जागा, राहण्याची जागा, वस्ती आणि इतर सार्वजनिक जागा या सुरक्षित रहाव्यात यासाठी दक्ष रहावे.

७) दिव्यांग बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा व परिसरात अडथळाविरहित वातावरणाची निर्मिती करावी.

८) आपल्या कार्यक्षेत्रातील बालविवाह, बालमजुरी, व्यसनाधीनता इत्यादी समस्यांना बळी पडू नये याकरिता पालक व ग्रामस्थांमध्ये जाणीवजागृती करावी.

◊◊◊

# ३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० : 'निपुण भारत मिशन'

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (NEP-2020) मध्ये मुलांच्या शिकण्यासाठी एक तातडीची आणि आवश्यक पूर्वअट म्हणून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर विशेष भर दिला आहे; कारण तोच मुलांच्या शिक्षणाचा मुख्य पाया आहे आणि भविष्यातील शिक्षणासाठी ती अनिवार्य अशी बाब आहे. सद्य:स्थितीत याबाबतचे चित्र फारसे समाधानकारक नसल्याचे विविध सर्वेक्षणांनी दाखवून दिले आहे. सर्वच मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आपण सारे कटिबद्ध असताना आणि आजवर राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरून अनेक वैशिष्ट्यपूर्ण प्रयत्न झाले असतानादेखील काही मुले मागे राहिल्याचे दिसून येत आहे; म्हणून सर्व मुलांबरोबरच वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेशित मुलांनाही सोबत घेऊन गुणवत्तेच्या दिशेने जाण्यासाठी 'निपुण भारत' ही मोहीम आपल्या मदतीसाठी नव्याने आली आहे. आपण ती यशस्वी करूया.

दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी राष्ट्रीय स्तरावरून 'निपुण भारत' या महत्त्वाकांक्षी मोहिमेचे उद्‌घाटन झाले आणि सर्व राज्यांच्या कानाकोपऱ्यांत 'निपुण भारत' चे गीत जाऊन पोहोचले.

*'निपुण भारत का सपना*
*सब बच्चे समझे भाषा और गणना'*

हे स्वप्न साकार होण्यासाठी 'निपुण भारत' (National Initiative for Proficiency in reading with Understanding and Numeracy) अंतर्गत असलेली पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या विषयीची ही महत्त्वपूर्ण आणि सर्वस्पर्शी मोहीम समजावून घ्यायला हवी.

### 'निपुण भारत'चे ध्येय :

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान सर्वांसाठी सहजसाध्य होईल, यासाठी योग्य वातावरण निर्मिती करणे, जेणेकरून इयत्ता तिसरीपर्यंतचे प्रत्येक मूल सन २०२६-२७ पर्यंत वाचन, लेखन आणि गणित यातील मूलभूत क्षमता प्राप्त करेल. यासाठी 'निपुण भारत' ही योजना पूर्वप्राथमिक ते इयत्ता तिसरीपर्यंतच्या मुलांवर लक्ष केंद्रित करीत आहे आणि इयत्ता तिसरीतील जी मुले या अपेक्षित क्षमता प्राप्त करू शकणार नाहीत, त्या मुलांकडे इयत्ता पाचवीपर्यंत विशेष लक्ष दिले जाणार आहे. मुलांना पायाभूत क्षमता प्राप्त झाल्या की, पुढील शिकणे सुलभ व्हायला मदत होते; कारण एकदा मूल वाचायला शिकले की, पुढे ते आपोआप शिकण्यासाठी वाचायला लागेल. तसेच गणितातील संख्या, आकार, मापन या बाबी समजून घेतल्यानंतर दैनंदिन व्यवहारातील बाबी तार्किक पद्धतीने समजून घेऊ शकेल. वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेशित मुलांना अध्यापन करताना या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.

## पायाभूत साक्षरता म्हणजे काय :

प्रत्येक मूल त्याच्या घरात जी भाषा बोलली जाते, त्या भाषेत छान बोलू शकते, संवाद साधू शकते; म्हणूनच मुलाच्या मातृभाषेला शाळेतही योग्य स्थान देणे गरजेचे आहे. मुलांच्या भाषिक कौशल्यांचा विकास शाळेत असताना, शिक्षकांवर अधिक अवलंबून असतो; म्हणून शाळांमध्ये पायाभूत साक्षरतेमधील पुढील घटकांचा विचार होणे गरजेचे आहे :

### (१) मौखिक भाषाविकास :

वाचन आणि लेखन कौशल्यांसाठी मौखिक भाषाविकास खूप महत्त्वाचा आहे. यामध्ये लक्षपूर्वक ऐकणे, समजून घेणे, मौखिक शब्दसंग्रह आणि संवादाचा समावेश होतो. या स्तरावरील मुलांसोबत सतत बोलत राहणे, श्रवणाचे अधिकाधिक अनुभव त्यांना देणे, त्यांचे म्हणणे ऐकून घेणे, छोट्या गोष्टी, बडबडगीते ऐकविणे या व अशा बाबींमुळे मुलांचा मौखिक भाषाविकास वेगाने होतो. मूल शाळेत येते, तेव्हा त्याच्याकडे त्याच्या घरातील, परिसरातील अनुभवांचा खूप मोठा खजिना असतो, जो दुर्लक्षित करून चालणार नाही. यासाठी त्याच्या बोलीभाषेचा स्वीकार करून त्याला बोलते करायला हवे.

### (२) विसांकेतीकरण (Decoding) :

मुलांच्या दृष्टीने प्रत्येक अक्षर हे एक चित्रच असते. ती ध्वनिचिन्हे असतात. या चिन्हांना विशिष्ट ध्वनीत व्यक्त करणे म्हणजे विसांकेतीकरण (Decoding). मुलांमध्ये ध्वनीची जाण निर्माण व्हावी, यासाठी अक्षर आणि ध्वनीतील सहसंबंध लक्षात आणून देणे, योग्य उच्चारांची सवय लावणे गरजेचे आहे. वाचनपूर्व तयारीमध्ये या बाबींचा विचार करायला हवा.

### (३) समजपूर्वक वाचन :

अचूक प्रवाही वाचन मुलांची मजकुराबद्दलची समज वाढवते. यामध्ये आशयानुसार योग्य आरोह–अवरोह यांचा उपयोग करून मुलांना वाचता येणे, योग्य आकलन होणे, तर्कसंगत विचार करायला शिकणे अभिप्रेत आहे. यासाठी वयोगटानुसार मुलांना वाचनसाहित्य उपलब्ध करून देणे, तसेच छापील साहित्याची ओळख वाढविणे आवश्यक आहे. आकर्षक ग्रंथालय विकसित करणे गरजेचे आहे. परिचित, अपरिचित उताऱ्यांवर प्रश्न विचारणे, उताऱ्याला शीर्षक सुचविणे तसेच सहभागी वाचन घेणे या कृती समजपूर्वक वाचनासाठी पूरक ठरतात.

### (४) लेखन :

अक्षर आणि शब्दांच्या लेखनासोबतच स्व–अभिव्यक्तीसाठी लेखनही यात समाविष्ट आहे. भाषा हे संवादाचे तसेच अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम आहे म्हणून त्यासाठी अधिकाधिक संधी मुलांना देणे गरजेचे आहे. मुलांना त्यांच्या रोजच्या अनुभवविश्वातील काही शब्द आपण दिले, तर मुले त्यावर कविता व छोटी गोष्ट तयार करतात. मुलांच्या भाषाविकासात वाचन, लेखन आणि बोलणे या कृती एकमेकांना परस्पर पूरक ठरतात.

भाषेप्रमाणेच गणितातील संख्याज्ञानाबाबतच्या मूलभूत क्षमता प्राप्त झाल्या, तर मूल दैनंदिन व्यवहारातील गणित समजून घेऊ शकेल. यामध्ये संख्यांची ओळख, संख्यांवरील क्रिया (बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार) आकार आणि स्थान यांविषयीची समज वाढविणे अपेक्षित आहे. मुलांमध्ये गणितीय संप्रेषणाबाबतची समज येण्यासाठी भाषेतील कौशल्ये उपयोगी ठरणार आहेत. भाषा आणि गणितातील या पायाभूत क्षमता इयत्ता तिसरीपर्यंत मुलांनी प्राप्त केल्या, तर त्यांचे पुढील शिकणे सोपे होईल, यासाठी 'निपुण भारत'ने पुढील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

## उद्दिष्टे :

- कला, क्रीडा यांच्या आधारे समावेशित वर्गवातावरणाची सुनिश्चिती करणे आणि मुलांच्या बोलीभाषेचा स्वीकार करणे.
- मुलांनी स्वतःहून वाचावे, लिहावे यांसाठी त्यांना प्रेरित करणे.
- मुलांना संख्याज्ञान, मापन आणि आकार या क्षेत्रांतील बाबी समजून घेण्यास सक्षम बनविणे.
- मुलांना त्यांच्या मातृभाषेतील/बोलीभाषेतील शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.
- शिक्षक, मुख्याध्यापक आणि पर्यवेक्षकीय यंत्रणा यांच्या क्षमतांचे संवर्धन करणे.
- निरंतर अध्ययनाचा मजबूत पाया तयार करण्यासाठी सक्रियरीत्या शिक्षक, पालक, विद्यार्थी, समाज या सर्वांच्या संपर्कात राहणे.
- सर्व विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तराचा मागोवा घेणे.

यापूर्वी प्रारंभिक भाषाविकास अभियान तसेच गणित संबोध प्रशिक्षणामध्ये या सर्व बाबींचा विचार करण्यात आला होता, हे आपणांस माहीत आहेच; तरीही यावर अजून अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज या मोहिमेने प्रतिपादित केली आहे.

## अध्ययन निष्पत्ती :

या मोहिमेतून जे अपेक्षित आहे, त्याचे प्रामुख्याने तीन विकासात्मक ध्येयांमध्ये वर्गीकरण केले आहे.


१) आरोग्य आणि कल्याण (HW - Health and Welbeing)

२) प्रभावी संप्रेषण (संवादक) (EC - Effective Communication)

३) सहभागी अध्ययनार्थी (IC - Involved Learners)

शिक्षणप्रक्रियेतून विद्यार्थी कसे घडावेत हे या तीन ध्येयांमधून योग्य रीतीने सांगितले आहे. यामधून प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वंकष विकास अपेक्षित आहे. पूर्वप्राथमिक स्तरापासून विद्यार्थ्यांचे योग्य सामाजिकीकरण, आरोग्यदायी सवयींचा विकास, वैयक्तिक आणि सामूहिक खेळातील सहभाग व कारक कौशल्यांचा विकास या सर्व मुख्य कौशल्यांचा यात समावेश आहे. तसेच निर्णय क्षमता, समस्या निराकरण, स्व-जाणीवेचा विकास या एकविसाव्या शतकातील जीवन कौशल्यांचाही यामध्ये समावेश आहे. मुलांनी प्रभावी

संवादक या भूमिकेतून भाषेचा समजपूर्वक उपयोग करावा. पुस्तकांशी मैत्री करून वाचनसंस्कृती विकसित करावी, तसेच सर्जनात्मक लेखनशैली जोपासावी, या गोष्टी अपेक्षित आहेत. भोवतालच्या परिस्थितीशी समन्वय साधून सतत शिकत राहणारा विद्यार्थी यामधून विकसित व्हावा, असे 'निपुण भारत' मोहिमेचे ध्येय आहे. ही विकासात्मक ध्येये साध्य होण्यासाठी बालवाटिका स्तरापासून इयत्ता तिसरीपर्यंतच्या अध्ययन निष्पत्ती या मोहिमेने निश्चित केल्या आहेत. त्यातील काही निवडक अध्ययन निष्पत्ती पुढीलप्रमाणे आहेत :





या सर्व अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियांमध्ये बदल होण्याची गरज आहे. NEP-2020 मध्ये सांगितल्यानुसार चित्रे, खेळणी, गोष्टी तसेच मुलांचे अनुभवविश्व या सर्वांचा एकत्रितरीत्या अध्यापनात उपयोग करणे गरजेचे आहे. स्थानिक स्तरावर मुलांनी, पालकांनी स्वतः तयार केलेल्या साधनांचा अध्यापनात अधिकाधिक उपयोग केला जावा. प्रथमच वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेशित होणाऱ्या मुलांसाठी शालेय वातावरण आनंददायी, उत्साही असण्याची गरज आहे. वर्गातील वातावरण आनंददायी, उत्साही असावे. सध्याच्या कोविडच्या पार्श्वभूमीवर तर मुलांना भावनिक आधाराची अधिक गरज आहे. एक समुपदेशक म्हणून शिक्षकांनी मुलांसोबत संवाद साधण्याची गरज ही मोहीम अधोरेखित करते. या मोहिमेत प्रत्येक मुलाच्या शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेण्यात राष्ट्रीय स्तरापासून ते गाव स्तरापर्यंतच्या यंत्रणेची महत्त्वाची भूमिका असणार आहे.

## पायाभूत संख्याज्ञान

**गरज :**

विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर, अध्ययन सद्य:स्थिती समजून घेण्यासाठी संपूर्ण देशात विविध सर्वेक्षणे केली जातात. एन.सी.ई.आर.टी. मार्फत करण्यात आलेले राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) हे त्यातीलच एक महत्त्वाचे सर्वेक्षण. २०१७ साली घेण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार गणिताची सरासरी संपादणूक दर्शविणारी स्थिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे :

| इयत्ता | तिसरी | पाचवी | आठवी | दहावी |
|---|---|---|---|---|
| देश | ६३% | ५३% | ४२% | ३४% |
| महाराष्ट्र | ६५% | ५२% | ४०% | ३३.५७% |




**राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण २०१७ : गणिताची सरासरी संपादणूक**

या आलेखावरून स्पष्टपणे असे दिसते की, इयत्तेच्या वाढत्या क्रमानुसार विद्यार्थ्यांच्या गणितातील सरासरी संपादणुकीचे प्रमाण कमी होत गेले आहे. विद्यार्थ्यांची संपादणूक कमी होत जाणे यामागील प्रमुख कारण म्हणजे विद्यार्थ्यांच्या गणितातील मूलभूत संकल्पना स्पष्ट नसणे. ही परिस्थिती बदलण्यासाठी विद्यार्थ्यांना त्या त्या इयत्तेच्या अध्ययन निष्पत्ती प्राप्त होण्यासाठी, तात्काळ व उद्दिष्टाधिष्ठित प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे.

**संकल्पना :**


दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी गणितीय संकल्पनांचा उपयोग व कारणमीमांसा करण्याची क्षमता म्हणजे पायाभूत संख्याज्ञान होय. वस्तू अचूक मोजता येणे, संख्यांची समज, संख्येचे संख्यापण, मूलभूत क्रियांचा समस्या निराकरणासाठी उपयोग, गणितीय विचार करता येणे या मुख्य बाबींचा समावेश पायाभूत

संख्याज्ञानात केला आहे. पायाभूत संख्याज्ञान प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये खालील क्षमता, कौशल्ये दिसून येतील.

- संख्यांचे अचूक वाचन व लेखन करतो.
- बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या मूलभूत क्रियांचा वापर करून दैनंदिन जीवनातील समस्या सोडवितो.
- गणित अचूक करतो, चुका ओळखून अचूक उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो.
- दैनंदिन जीवनात तर्कबुद्धीचा वापर करतो.
- गणितीय दृष्टिकोनाचा अवलंब करून तार्किकदृष्ट्या योग्य निर्णय घेतो व त्यामागची कारणमीमांसा सांगतो.

**घटक :**

तार्किक विचार व कारणमीमांसा या क्षमतांचा विकास करण्यासाठी पायाभूत संख्याज्ञानावर विद्यार्थ्यांनी प्रभुत्व मिळविणे गरजेचे आहे. संख्यांची योग्य समज, संख्यांवरील चार मूलभूत क्रियांचा अचूक वापर इत्यादी बाबी जीवनाचा अविभाज्य भाग आहेत, त्याचबरोबर भविष्यातील किंवा पुढील शिक्षणाचा पाया आहे आणि म्हणूनच प्राथमिक गणिताच्या पुढील सात घटकांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते :




### (१) संख्यापूर्व संबोध :

वस्तू मोजणे तसेच संख्यांची समज विकसित होण्यापूर्वी मुलांमध्ये वर्गीकरण, क्रमबद्धता, एकास एक संगती यांसारख्या क्षमतांचा विकास होणे गरजेचे असते, यांनाच 'संख्यापूर्व संबोध' असे म्हणतात.

**(२) संख्या व त्यावरील क्रिया :**

संख्यांचे वाचन, अंकात व अक्षरात संख्यांचे लेखन, संख्यांची तुलना व संख्यांवर केल्या जाणाऱ्या बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार या चार मूलभूत क्रियांचा समावेश या घटकात होतो.

**(३) आकार आणि अवकाशीय संबोध यांचे आकलन :**

विविध आकार, अवकाश, मापन, स्थान, दिशा, गती इत्यादींचा समावेश असणारा व आपण ज्या जगात वावरतो त्याचे वर्णन व वर्गीकरण करण्यासाठी आवश्यक व उपयुक्त असणारा हा घटक आहे.

**(४) गणितीय संप्रेषण/संवाद :**

गणितातील चिन्हे, प्रतीके, आकृत्या, आलेख इत्यादींचा वापर करून एकमेकांकडून माहितीचे आदानप्रदान व परस्परांशी संवाद साधण्याची प्रक्रिया म्हणजे गणित संप्रेषण.

**(५) माहितीचे व्यवस्थापन :**

माहितीचा प्रचंड विस्फोट हे एकविसाव्या शतकाचे व्यवच्छेदक लक्षण आहे आणि म्हणूनच माहितीचे संकलन व माहितीच्या व्यवस्थापनाशी संबंधित क्षमतांचा विकास होणे आवश्यक आहे.

**(६) आकृतिबंध :**

आकृतिबंध हा गणिताच्या अभ्यासातील महत्त्वाचा घटक आहे. रोजच्या जीवनात व गणितात विविध प्रकारचे आकृतिबंध आढळतात. नवीन आकृतिबंध तयार करणे, आकृतिबंधाची रचना व वर्णन, आकृतिबंध ओळखणे, आकृतिबंधाचा विस्तार या बाबींचा समावेश या घटकात होतो.


**(७) मापन :**

मापन हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लांबी, वजन, आकारमान, तापमान इत्यादी राशींच्या मापनाशी संबंधित कृती तर मुले नेहमीच करीत असतात.

## पायाभूत संख्याज्ञान विकसित होण्यासाठी अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोन :

(गणित अध्यापनाचा ELPS दृष्टिकोन) – मुलांना पायाभूत संख्याज्ञान प्राप्त होण्यासाठी आपल्याला शास्त्रीय दृष्टिकोनातून अध्यापनाकडे पाहावे लागेल. निश्चित केलेली पायाभूत संख्याज्ञानाची उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षकांनी आपल्या अध्यापनात या दृष्टिकोनाचा वापर करण्याची आवश्यकता आहे.

### गणित अध्यापनाचा ELPS दृष्टिकोन



## (१) अनुभव (Experience) :

प्राथमिक स्तरावरील गणित अध्यापनात बहुतांश वेळा चिन्हे/प्रतीके वापरून होणारी सुरुवात खरे तर चिंतेची बाब आहे. मुलांना प्रत्यक्ष कृती करण्याचा अनुभव देऊन सुरुवात करणे हा गणित अध्यापनाचा मुख्य भाग असावा. मुलांना गणितीय संकल्पनांचे स्पष्ट आकलन होण्यासाठी साहित्य, गणितीय खेळ यांची मदत घेऊन अध्ययन अनुभवांची रचना करावी. गणित पेटीतील साहित्य, साधने, काही खेळणी, सभोवतालच्या परिसरातील सहज उपलब्ध वस्तू यांचा वापर मुलांना गणितीय संकल्पनांचे दृश्यीकरण (Visualization) होण्यासाठी उपयुक्त ठरतो. प्रत्यक्ष अनुभव देत असताना शिक्षकांनी मार्गदर्शकाच्या भूमिकेतून सुविधादात्याच्या (Facilitator) भूमिकेत जायला हवे.

## (२) भाषा (Language) :

मूल घरी ज्या भाषेत बोलते ती घरची भाषा, गणिताच्या वर्गात गणित शिकताना खूप महत्त्वाची भूमिका बजावते. मुलांना त्यांच्या बोलीभाषेत अध्यापन केले तर गणितीय संकल्पनांचे आकलन सहज होते. भाषा ही शिक्षकांकडून अध्ययन अनुभवांच्या आधारे विशिष्ट संदर्भ वापरून विकसित होत असते. गणिताची भाषा आणि मुलांची घरची भाषा यांची घट्ट सांगड मुलांना संकल्पनांचे आकलन व गणितीय संवाद साधण्यात मदत करते म्हणूनच प्राथमिक शिक्षणात गणित व भाषा एकात्मिक पद्धतीने शिकविणे गरजेचे आहे.

## (३) चित्रांचा वापर (Pictures) :

वर्गात ज्या वस्तू, साधने, गोष्टी प्रत्यक्ष देऊन अध्ययन अनुभव देणे शक्य नसते तेव्हा योग्य त्या ठिकाणी चित्रांचा वापर करावा लागतो. उदाहरणार्थ, एका झाडावर दोन चिमण्या बसल्या होत्या. थोड्या वेळानंतर अजून तीन चिमण्या येऊन बसल्या, तर आता झाडावर एकूण किती चिमण्या बसल्या आहेत? असे परिसरातील अनुभव प्रत्यक्ष वर्गात देणे शक्य नसते. तेव्हा चिमणी, झाडे यांची चित्रे मदत करतात. दृश्यीकरण कौशल्ये विकसित करण्यात चित्रांचा मोठा वाटा असतो, म्हणजेच चित्रे ही अनुभवांचे प्रतिनिधित्व करतात.

## (४) चिन्हे/प्रतीके (Symbols) :

चिन्हे/प्रतीकेही अनुभवांचे सामान्यीकरण करण्यासाठी मदत करतात. उदा. (१) अनिताजवळ पाच फुगे आणि जॉनकडे तीन फुगे आहेत. दोघांकडे मिळून आठ फुगे आहेत. (२) सायराने शनिवारी पाच चित्रे, रविवारी तीन चित्रे काढली. तिने एकूण आठ चित्रे काढली. (३) बाबांनी हरप्रीतला पाच रुपये दिले, तर आईने तीन रुपये दिले. हरप्रीतकडे आठ रुपये झाले. या तीनही उदाहरणांची दैनंदिन जीवनाशी निगडित गणिती मांडणी ५ + ३ = ८ अशी होईल. या ठिकाणी आपण पाच चिन्हांचा वापर करून रोजच्या जीवनातील अनुभवांचे सामान्यीकरण केले; परंतु अंक,

संख्या, संख्यांवरील क्रिया शिकविण्याची सुरुवात प्रत्यक्ष वस्तू, चित्रे व नंतर चिन्हे/प्रतीके या क्रमाने व्हायला हवी.

गणित अध्ययन–अध्यापनाचा ELPS दृष्टिकोन गणिताच्या वर्गाध्यापनात वापरल्यास पायाभूत संख्याज्ञानाशी संबंधित क्षमता, कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित होण्यास नक्कीच मदत होईल. 'निपुण भारत' हे मिशन राष्ट्र–राज्य–जिल्हा–तालुका–शाळा या पाच स्तरांवर सुव्यवस्थित यंत्रणेच्या माध्यमातून कार्यान्वित होणार आहे. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक घटकाने याच्याशी संबंधित आपली भूमिका ओळखून कार्य केल्यास निश्चितपणे सन २०२६–२७ पर्यंत ३ ते ९ वर्षे वयोगटातील सर्व मुले पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त करण्यात यशस्वी होतील.

◈◈◈




# ४. वयानुरूप प्रवेश व शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी

**शाळा प्रवेशाबाबत पुढील मुद्दे महत्त्वाचे आहेत :**

### (अ) प्रवेश प्रक्रियेकरिता चाळणी परीक्षा नाही :

शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार देशातील कोणत्याही शाळेस प्रवेश प्रक्रिया करण्यासाठी चाळणी परीक्षा घेता येणार नाही. तसेच प्रवेशासाठी मुलाखती, तोंडी परीक्षा, लेखी परीक्षा घेता येणार नाही. प्रत्येक बालकाला तो जेथे राहतो त्या परिसरात उपलब्ध असलेल्या एक किलोमीटरच्या परिसरातील शाळेत प्रवेश घेण्याचा अधिकार आहे. तेथील प्रवेशासाठी त्याला अडथळा येणार नाही. प्रवेश मिळणे हा त्याचा हक्क आहे, तर प्रवेश देणे हे आपले कर्तव्य आहे. विविध स्वरूपाच्या परीक्षा घेऊन प्रवेश दिला जात असेल, तर तो कायद्याचा भंग ठरणार आहे.

### (ब) मोफत प्रवेश व शिक्षणाची संधी (कलम १३) :

शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत शिक्षण उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा बालकाला हक्क प्राप्त झाला आहे. त्यामुळे त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही प्रकारे प्रवेश फी, देणगी अथवा इतर कोणत्याही शीर्षकाखाली पैसे घेऊन प्रवेशास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामुळे मोफत शिक्षण हा बालकाचा हक्क असल्याने त्यापासून त्याला कोणीही रोखू शकणार नाही.

### (क) वयानुरूप प्रवेश :

शिक्षण हक्क कायद्यातील कलम ४ प्रमाणे प्रत्येक शाळाबाह्य मुलाचे शिक्षण होणे ही सरकारची पर्यायाने शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी आहे. शाळाबाह्य म्हणून दोन प्रकारच्या विद्यार्थ्यांचा समावेश केला जातो.

१) जो विद्यार्थी कधीही शाळेत गेलेला नाही.

२) जो विद्यार्थी सलग ३० दिवसांपेक्षा अधिक काळ गैरहजर आहे.

शाळेच्या कार्यक्षेत्रात वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थी आढळून आल्यास, त्यास वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल करावे. त्याकरिता कोणत्या वयाचा विद्यार्थी कोणत्या वर्गात दाखल करावा ते पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

| अ. क्र. | वय | इयत्ता |
|---|---|---|
| १) | ६ + | पहिली |
| २) | ७ + | दुसरी |
| ३) | ८ + | तिसरी |
| ४) | ९ + | चौथी |
| ५) | १० + | पाचवी |
| ६) | ११ + | सहावी |
| ७) | १२ + | सातवी |
| ८) | १३ + | आठवी |

वरीलप्रमाणे शासनाने निश्चित केलेल्या मानीव दिनांकास वय निर्धारित करण्यात यावे. त्यानुसार विद्यार्थ्यांना वर्षभरात केव्हाही प्रवेश देण्यात यावा. कोणतेही बालक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर असणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण-प्रशिक्षण सुव्यवस्थित सुरू राहील असे नियोजन करून मुलांना त्या-त्या इयत्तेच्या क्षमता प्राप्त होतील असे पाहावे. याकरिता राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे च्या वतीने इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांकरिता अभ्यासक्रम (विषय - मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित) विद्यार्थी मित्र पुस्तिका, शिक्षक मार्गदर्शिका विकसित करण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णयाप्रमाणे विद्यार्थ्याचे वय निर्धारित करणे, त्याला योग्य वर्गात प्रवेश देणे ही शाळेची जबाबदारी आहे.

### (ड) वर्षभरात केव्हाही प्रवेश :

कायद्यानुसार कोणताही विद्यार्थी कोणत्याही शासनमान्य शाळेत शैक्षणिक वर्षाच्या कोणत्याही दिवशी शाळेत प्रवेश घेऊ शकतो. सत्र सुरू झाल्यानंतर पहिल्या दिवसापासून ते सत्राच्या शेवटच्या दिवसापर्यंत विद्यार्थ्याला शाळेत प्रवेश मिळण्याचा अधिकार आहे. बालकाला निर्धारित कालावधीनंतरही प्रवेश मिळण्याचा अधिकार असेल, अशा स्वरूपात उशिरा प्रवेश घेतला असेल, तर त्या विद्यार्थ्यांच्या विशेष शिक्षणाची सोय मिळविण्याचा त्याला अधिकार असेल.

### (इ) वयाच्या पुराव्याशिवाय प्रवेश :

शाळेत दाखल होणाऱ्या प्रत्येक बालकाला प्रवेशासाठी जन्माचा पुरावा म्हणून जन्मदाखल्याची मागणी करण्यात येते. त्याशिवाय प्रवेश दिला जात नाही. मात्र आता कायद्याने विद्यार्थी अथवा पालकांकडे

जन्माचा पुरावा नसेल, तर त्याला प्रवेशापासून वंचित ठेवता येणार नाही. त्याकरिता कायद्याने पुढील पर्यायांचा विचार केला आहे :

१) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जन्म दाखल्याची प्रत.

२) रुग्णालयाने किंवा साहाय्यकारी परिचारिका व प्रसाविका यांनी केलेली नोंद किंवा ठेवलेला अभिलेख.

३) अंगणवाडी सेविकेकडील जन्माची नोंद प्रत.

४) पालकांचे प्रतिज्ञापत्र.

यांपैकी कोणताही एक पुरावा ठेवून प्रवेश मिळेल. कोणत्याही स्वरूपात प्रवेशापासून बालकाला दूर ठेवता येणार नाही.

(संदर्भ : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम–२००९, शाळा प्रवेश शासन निर्णय क्र. पीआरई/२०१०/(२१५)प्रा.शि.–१ दि. ११ जून २०१०)

### (फ) दाखला हस्तांतरण :

शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्याला कोणत्याही शाळेत शिकण्याचा अधिकार आहे. त्यामुळे तो विद्यार्थी ज्या शाळेत शिकू इच्छित असेल, त्या शाळेत शिकण्यासाठी त्याला शाळा सोडल्याचा दाखला तात्काळ देणे हे मुख्याध्यापकांचे कर्तव्य आहे. त्याकरिता विद्यार्थी/पालकांनी मागणी केली तरी दाखला देता येईल. शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या मागणीची प्रतीक्षा करता कामा नये. कायद्याने विनाविलंब, तात्काळ दाखला प्राप्त करणे हा बालकाचा अधिकार आहे. त्यात कोणत्याही परिस्थितीत अडथळा निर्माण करता येणार नाही. मात्र कोणत्याही परिस्थितीत, दाखला नाही म्हणून प्रवेश नाकारला जाऊ शकत नाही.

### शाळाप्रवेश :

शाळा कार्यक्षेत्रातील परिसरात असलेल्या मुलांचे सर्वेक्षण करून, त्यांची माहिती घेऊन त्यांना शाळेत प्रवेशित करणे ही शालेय व्यवस्थापन समिती व शिक्षक यांची जबाबदारी आहे.



सर्वेक्षणातून आढळणाऱ्या विद्यार्थ्यांची सामाजिक, कौटुंबिक परिस्थिती यांबाबत माहिती घेऊन, गरज असलेल्या विद्यार्थ्यांना सामाजिक व भावनिक आधार मिळावा, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना शिक्षणप्रवाहात आणले जावे, यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापक यांनी नियोजन करणे आवश्यक आहे.

**(१) शिक्षणातील सातत्य :**

शाळेत पहिल्या वर्गात दाखल झाल्यानंतर तो विद्यार्थी आठवीपर्यंत कोणत्याही परिस्थितीत मागे राहणार नाही किंवा शाळाबाह्य होणार नाही यासाठी शाळा, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीने प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

**(२) शिक्षण हक्क प्रमाणपत्र :**

६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकाच्या शिक्षणाची जबाबदारी शासनावर आहे. देशातील प्रत्येक मुलाला प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत आहे, त्यामुळे प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर या देशातील प्रत्येक बालकाला कलम ३० प्रमाणे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले असल्याचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. कायद्यातील तरतुदींचा विचार करता राज्य शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्याच्या नियमावलीतील प्रसिद्ध केलेल्या नमुन्यात सदरचे प्रमाणपत्र इयत्ता आठवीचे मुख्याध्यापक स्वतःच्या स्वाक्षरीने देतील. त्यात प्राथमिक स्तरावरील सर्व विद्याविषयक कौशल्ये आत्मसात केली असल्याची नोंद असणार आहे. असे प्रमाणपत्र दिले गेले आहे का? या संदर्भाने शाळा व्यवस्थापन समितीने उचित कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

**(३) बालस्नेही शिक्षण :**

शाळेत दाखल होणाऱ्या प्रत्येक बालकाला शिकण्यासाठी पुरेसे आनंददायी वातावरण असायला हवे. त्याला भावनिकदृष्ट्या सकारात्मक वातावरणाचा आधार हवा, तसेच शारीरिकदृष्ट्या देखील विश्वास मिळायला हवा. शिकताना कोणत्याही परिस्थितीत मुलांना भीती वाटता कामा नये. बालक शिकत असताना ज्यामुळे शिकणे अधिक चांगले वाटेल त्या पद्धतीने शिकणे व्हावे या दृष्टीने प्रयत्नांची गरज आहे. बालकेंद्रित शिक्षणाची विचारधारा महत्त्वाची आहे. आनंददायी व कृतियुक्त अध्ययन प्रक्रिया, प्रसन्न व उत्साहवर्धक वर्गशालेय परिसर, गरजांनुरूप भौतिक सुविधांची उपलब्धता, विचारांच्या मुक्त अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, विविध शैक्षणिक व खेळाच्या साहित्याची उपलब्धता, छंदांची जोपासना व निर्मितीचा आनंद यांसारख्या बाबी शालेय स्तरावर अपेक्षित आहेत.

बालस्नेही वातावरणात विद्यार्थ्यांना मुक्त संवाद करता यावा. मुलांच्या मनात जे काही प्रश्न आहेत ते सर्व प्रश्न त्यांना विचारता यायला हवे. त्याकरिता शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याशी मुक्त संवाद करता यावा. बालक व शिक्षक यांच्यामध्ये जवळचा नातेसंबंध निर्माण होईल असे पाहावे लागणार आहे. त्यासाठी शिक्षक–बालक यांची आंतरक्रिया महत्त्वाची आहे. बालकांना शिक्षण घेताना ज्या

अडचणी येतील, त्यांच्या निराकरणाचा विचार करायला हवा. एकूण शिकणे म्हणजे आनंद अशाच वातावरणाची गरज आहे. त्यामुळे कायद्यातील कलम १७ मध्ये कोणत्याही प्रकारे शारीरिक, मानसिक शिक्षा करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामागील कारण हे आहे, की शिक्षण घेताना शाळेत कोणत्याही प्रकारे भीती वाटता कामा नये. शिक्षेमुळे विद्यार्थी शिकत नाही, तर अनेकदा शिक्षणापासून दूर जाण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत शाळेत विद्यार्थ्याला अशी शिक्षा केली जात नाही ना? हे पाहणे शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी आहे.

### (४) किशोरवयीन मुलांचे शिक्षण :

किशोरवयीन मुलांसाठी जीवनकौशल्ये अत्यंत महत्त्वाची आहेत, कारण त्यामुळे ते दैनंदिन आयुष्य जगायला सक्षम होतात. ही कौशल्ये त्यांना जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या परिस्थितीला सामोरे जायला मदत करतात.

### (५) शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका :

शाळा व्यवस्थापन समितीला किशोरावस्थेतील बदलांबद्दल माहिती हवी. या वयातील मुलांच्या विकासाशी निगडित बाबी, समस्या यांची जाण समितीला असल्यास ते योग्य ते उपाय करू शकतात. समितीने किशोरवयीन मुले शिकतील, त्यांच्यात जीवन कौशल्ये विकसित होतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

# ५. आदर्श (प्रमाणित) संचालन प्रक्रिया

## Standard Operating Procedure (SOP)

## स्थलांतरित होणाऱ्या कामगारांच्या बालकांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी सर्वेक्षण व त्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करणे.

**प्रस्तावना :**

राज्यात बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा हक्क आहे. असे असले तरी राज्यात पालकांचे विविध व्यवसायाच्या निमित्ताने होणारे स्थलांतर व त्यामुळे मुलांच्या प्राथमिक/माध्यमिक शिक्षणात खंड पडण्याची समस्या निर्माण होताना दिसत आहे. त्यातही मुलींचे प्रमाण वाढण्याची भीती जास्त आहे. स्थलांतर करणारी कुटुंबे ही आर्थिक स्तर निम्न असलेल्या वंचित सामाजिक गटातील, भूमिहीन अथवा अल्पभूधारक असतात. तसेच रोजगाराची अनिश्चितता, सामाजिक असुरक्षितता व पालकांच्या मनातील भीती यामुळे वाढणारी बालमजुरी आणि बालविवाहांचे प्रमाण वाढत आहे; ते रोखण्याचे एक आव्हान आहे. मोठ्या प्रमाणात ही कुटुंबे ऊसतोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्रात तर शेजारी असणाऱ्या कर्नाटक व गुजरात या राज्यात स्थलांतर करतात. सदर स्थलांतर साधरणतः माहे सप्टेंबर ते माहे मे या कालावधीत होत असते. तसेच वीटभट्टी, दगडखाण मजूर, कोळसाखाणी, शेतमजुरी, बांधकाम व्यवसाय, रस्ते, नाले, जिनिंग मिल इत्यादी प्रकारच्या कामानिमित्त विविध कामगार स्थलांतर करीत असतात. यशिवाय राज्यातील तमाशा कलावंत व गावोगावी फिरणारे भटके विमुक्त यांच्या मुलांचा देखील यात वेगळा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे वय वर्षे ३ ते १८ या सर्व वयोगटातील बालकांचा विचार करणे आवश्यक आहे.

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम (४) नुसार अशा स्थलांतरित मुलांना शिक्षण हमीकार्ड देण्याची तरतूद करण्यात आली असून त्याद्वारे शिक्षणाच्या प्रवाहात राहता येईल, हे प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच स्थलांतरित मुलांचे सर्वेक्षण करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी स्थलांतरित बालकांच्या बाबतीत करावयाच्या उपाययोजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. यासाठी राज्यामध्ये अशा विविध कारणांमुळे स्थलांतरित होणाऱ्या कामगारांच्या बालकांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी व्यापक स्वरूपात सर्वेक्षण घेऊन अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी याबाबतच्या प्रतिबंधात्मक कार्यवाहीअंतर्गत सर्वेक्षण हाती घेण्यासाठी खालीलप्रमाणे अवलंब करावा.

**स्थलांतरित बालकांच्या बाबतीत मुख्यतः दोन प्रकारात वर्गीकरण होते :**

१) कुटुंबासोबत स्थलांतरित होऊन जाणारी बालके.

२) कुटुंबासोबत स्थलांतरित होऊन येणारी बालके.

### उद्दिष्टे :

- बालकांचे पालकांसोबत होणारे स्थलांतरित थांबविणे.
- स्थलांतरित बालकांना त्याच परिसरात शिक्षणाच्या प्रवाहात कायम ठेवणे.
- स्थलांतरित बालकांना शिक्षण हमीकार्ड देणे.

### सर्वेक्षणाची कार्यपद्धती, मार्गदर्शक सूचना व सामान्य प्रतिबंधात्मक उपाय :

(१) दरवर्षी शाळेतून स्थलांतरित होणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण माहे नोव्हेंबरमध्ये नियमित स्थलांतरित होत असलेल्या, पालकांच्या घरोघरी जाऊन पूर्ण करणे. सदर **वय वर्षे ३ ते १८ या सर्व वयोगटातील** बालकांना शाळेत प्रवेशित करून **त्यांचे शिक्षण सामान्य विद्यार्थ्यांसोबतच सुरू होईल.**

(२) सदर मोहिमेत १८ वर्षे वयोमर्यादेपर्यंतच्या दिव्यांग बालकांचाही समावेश करण्यात यावा.

(३) शासनाने वेळोवेळी घेतलेल्या शाळाबाह्य/स्थलांतरित बालकांच्या सर्वेक्षणाच्या वेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनाही लक्षात घ्याव्यात, त्याचप्रमाणे कार्यप्रणाली अंमलात आणावी, की जेणेकरून सदर कामामध्ये सोपेपणा येईल.

(४) सदर सर्वेक्षणाची मोहीम ग्रामीण व नागरी भागातील वाड्या, गाव, वॉर्ड, या स्तरांवर तसेच खास करून वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, शेतमजूर अशा उद्योगांच्या ठिकाणी, की जेथे स्थलांतरित मजूर व कामगार येतात अशा ठिकाणी राबवावी.

(५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास), बालविकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण व नागरी) यांच्या समन्वयाने गाव, केंद्र, बीट, विभाग व शाळा स्तरानुसार अशाप्रकारे ग्रामीण ते नागरी स्तरापर्यंत करावयाच्या कामाचे नियोजन तयार करावे, तसेच सर्वेक्षण करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची यादी तयार करून कामकाजाचे निश्चितीकरण करून संबंधितांना आदेशित करावे.

(६) कामकाजाचे व जबाबदाऱ्या निश्चित केल्यानंतर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करावे. यात प्रपत्रांमध्ये माहिती भरताना ती माहिती वैध असल्याची खात्री करूनच पत्रकांमध्ये माहिती भरण्याचे प्रशिक्षण द्यावे.

(७) ग्रामीण भागातील क्षेत्रकामासाठी ग्राम स्तरावरील समित्यांचे तसेच नागरी भागात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे योगदान घ्यावे.

(८) क्षेत्रीय काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दैनिक अहवाल नियमितपणे घ्यावेत.

(९) स्थलांतरित विद्यार्थ्यांच्या याद्या निश्चित करणे. सर्वेक्षणामध्ये बाहेरगावी स्थलांतरित होऊन गेलेल्या बालकांची माहिती सोबतच्या **पत्रक-अ** मध्ये तसेच बाहेरगावाहून स्थलांतरित होऊन आलेल्या बालकांची

माहिती **पत्रक–ब** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात शाळा, गाव, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर माहिती संकलित करणे.

(१०) स्थलांतर स्थानिक पातळीवर रोखण्यासाठी मुलांच्या जवळचे नातेवाईक, हंगामी वसतिगृह, सामाजिक, सेवाभावी संस्था यांची मदत घेणे.

(११) स्थलांतर होऊच नये यासाठी प्रत्येक गाव ते जिल्हा अशा प्रत्येक स्तरावर जाणीवजागृती कार्यशाळा/मेळावे आयोजित करावेत. यामध्ये स्थलांतरामुळे होणारे शैक्षणिक नुकसान व त्याचे दुष्परिणाम लक्षात आणून द्यावेत. स्थानिक पातळीवर स्थलांतर रोखण्यासाठी समुपदेशकामार्फत पालकांचे समुपदेशन करावे.

(१२) स्थानिक पातळीवर कार्यरत बालरक्षक यांना सोबत घेऊन सर्वेक्षणात व नंतर स्थलांतरित परिसरामध्ये कार्यरत बालरक्षकांचा समन्वय साधणे.

(१३) स्थलांतरित होऊन येणाऱ्या कुटुंबाचे राहण्याचे ठिकाण/वस्ती शाळेच्या नजीक किंवा परिसरात असेल याची दक्षता सरपंचांच्या अध्यक्षतेखालील गाव स्तर समिती घेईल. त्यामुळे स्थलांतरित कुटुंबाचे राहण्याचे ठिकाण शाळेच्या नजीक असल्यास अशा कुटुंबातील प्रत्येक बालके शाळेत दाखल करणे किंवा त्यांची शाळेतील उपस्थिती टिकविणे सोयीचे होईल.

(१४) स्थलांतरित कुटुंबाची वस्ती शाळेपासून जास्तीतजास्त एक किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावर शाळा असल्यास अशा कुटुंबातील बालकांना संबंधित कारखाने उद्योग, व्यावसायिक यांच्या सहकार्यातून वाहतूक व्यवस्था पुरवून नियमित शाळेत आणण्यात यावी. यासाठी याबाबत गाव व तालुका पातळीवरील समितीने आवश्यक समन्वय साधून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी.

(१५) एकाच ठिकाणाहून ३० पेक्षा जास्त विद्यार्थी शाळेत येत असतील व त्यांना जवळच्या शाळेत नियमित येणे सोयीचे नसेल, तर अशा ठिकाणी संबंधित व्यावसायिकांनी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून स्वयंसेवकांची नियुक्ती करून त्या मुलांना शिक्षणाची सुविधा द्यावी. अशा मुलांच्या शिक्षणाचे सनियंत्रण नजीकच्या नियमित शाळेमार्फत होईल.

(१६) शाळांनी **CSR च्या माध्यमातून** हंगामी वसतिगृहाची निर्मिती, साखर कारखाने, उद्योग, व्यवसायिक यांच्या समन्वय व सहकार्यातून स्थलांतरित बालकांकरिता आवश्यक वर्ग खोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी इत्यादी भौतिक सुविधा स्वयंसेवक/मदतनीस यांच्या माध्यमातून वाहतूक सुविधेचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा.

(१७) स्थलांतरित होऊन येणाऱ्या बालकांना नियमित शाळेत दाखल करून मोफत शिक्षणासह शालेय पोषण आहार व अन्य शासकीय सुविधा पुरविण्यात याव्यात.

(१८) हंगामी वसतिगृहासाठी किमान विद्यार्थी संख्येची अट कमी करावी.

(१९) हंगामी वसतिगृहात सकाळच्या न्याहरीऐवजी जेवण देणे आवश्यक.

(२०) लेखनसाहित्य तरतुदींची फेरनिश्चिती करावी.

(२१) सर्व प्रयत्नांनंतर सुद्धा स्थलांतर होऊन जाणारे बालक व स्थलांतर होऊन येणारे बालक आणि प्रयत्नपूर्वक स्थलांतरापासून रोखून धरलेले बालक अशा तीन वेगवेगळ्या याद्या संपूर्ण माहितीसह सॉफ्ट व हार्ड कॉपीसह गाव, तालुका, जिल्हा व राज्य कक्षाकडे उपलब्ध ठेवाव्यात.

(२२) परराज्यात गेलेल्या बालकांसाठी संभाव्य उपाययोजनेसाठी अभ्यासगट स्थापन करावा व त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

(२३) विविध विभागांच्या निवासी शिक्षण केंद्राचा हंगामी उपयोग होऊ शकेल काय? या शक्यतेचा विचार करण्यात यावा.

(२४) स्थलांतर काळात पर्यायी शिक्षण विभागाचा तालुका व जिल्हा स्तरावर कक्ष संपूर्ण माहितीसह कार्यान्वित ठेवावा.

(२५) या कामी **लोकप्रतिनिधी**, विविध शालेय स्तरावर कार्य करणाऱ्या **स्वयंसेवी संस्था** यांची मदत घ्यावी.

(२६) स्थलांतरित मुलांना **शिक्षण हमी कार्ड** (EGC) देऊन त्यांचे १०० टक्के प्रवेश स्थलांतरित परिसरातच होतील यासाठी प्रयत्न करणे.

(२७) १०० टक्के स्थलांतरित मुलांचे आधार कार्ड/U-DISE/Student Portal प्रणालीसोबत संलग्न करून स्थलांतरित ठिकाणी असलेल्या स्थानिक शाळा, साखरशाळा यांसारख्या व्यवस्थेस कळविणे.

(२८) विशिष्ट कालावधीनंतर स्थलांतरित मुलांची पर्यायी शिक्षण व्यवस्था १०० टक्के पूर्ण झाली किंवा नाही याबाबत खात्री करणे.

(२९) तंत्रज्ञानाच्या प्रसार माध्यमाच्या साहाय्याने स्थलांतरित मुलांची प्रगती/स्थिती वेळोवेळी जाणून घेणे.

(३०) स्थलांतरित बालकांची नोंद हजेरी पत्रकावर घेण्यात यावी. तसेच मुले निघून गेल्यानंतर स्थलांतरित झालेला असा शेरा देऊन विद्यार्थ्यांचे नाव कमी करण्यात यावे.

(३१) प्रत्येक शाळेच्या दर्शनी भागात शाळाबाह्य विद्यार्थी नसल्याबाबतचा फलक लावण्यात यावा.

(३२) स्थलांतरित होऊन जाणाऱ्या जिल्ह्यातील बालकांची यादी व स्थलांतरित होऊन आलेल्या जिल्ह्यातील बालकांची यादी राज्यस्तरावर एकत्र करून त्यांचे जिल्हानिहाय वर्गीकरण करण्यात यावे.

(३३) स्थलांतरित होऊन येणाऱ्या बालकांची शाळेतील उपस्थिती टिकवून ठेवण्यासाठी शासन नियमानुसार प्रोत्साहन भत्ता व उपस्थिती भत्ता देण्यात यावा. तसेच स्थलांतरित कालावधीत मुलांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी समग्र शिक्षा अंतर्गत लेखनसाहित्य यासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात यावी.

३४) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील समता विभागामार्फत बालरक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केले जाईल.

३५) स्थलांतरामुळे नवीन शाळेत वर्गात विद्यार्थ्यांमध्ये तात्पुरते दाखल झालेल्या बालकास समजून घेणे आवश्यक आहे. अशा बालकास इतर विद्यार्थ्यांसह शिक्षणप्रवाहात सामावून घेताना अनुसरावयाच्या कार्यपद्धतीची हस्तपुस्तिका/मार्गदर्शक सूची समता विभागाने संबंधित शाळेस देणे आवश्यक आहे.

## सर्वेक्षणाच्या अंमलबजावणीबाबत :

### नोडल अधिकारी

| अ. क्र. | पदनाम | कार्यक्षेत्र | वयोगट |
|---|---|---|---|
| १) | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | जिल्हा स्तर | ३ ते ६ वर्षे |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | जिल्हा स्तर | ६ ते १४ वर्षे |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक व उच्च माध्यमिक) | जिल्हा स्तर | १४ ते १८ वर्षे |
| ४) | गटशिक्षणाधिकारी | तालुका स्तर | ६ ते १८ वर्षे |
| ५) | बालविकास प्रकल्प अधिकारी | ग्रामीण व नागरी | ३ ते ६ वर्षे |
| ६) | प्रशासन अधिकारी (नपा/मनपा) | नागरी क्षेत्र | ६ ते १८ वर्षे |
| ७) | प्रशासकीय अधिकारी (महिला व बालविकास अधिकारी) | नागरी क्षेत्र | ३ ते ६ वर्षे |

### पर्यवेक्षक

| अ. क्र. | पदनाम | कार्यक्षेत्र | वयोगट |
|---|---|---|---|
| १) | केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक | ग्रामीण व नागरी | ६ ते १८ वर्षे |
| २) | अंगणवाडी पर्यवेक्षक | ग्रामीण व नागरी | ३ ते ६ वर्षे |

### प्रगणक

| अ. क्र. | पदनाम | कार्यक्षेत्र | वयोगट |
|---|---|---|---|
| १) | प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण | ग्रामीण व नागरी | ६ ते १८ वर्षे |
| २) | अंगणवाडी सेविका/मदतनीस | ग्रामीण व नागरी | ३ ते ६ वर्षे |

## सर्वेक्षणाच्या कामाचे वेळापत्रक

| अ. क्र. | नियोजन कार्यवाही | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|
| १) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेसोबत याबाबत बैठक आयोजित करणे, सदर बैठकीत विषयांतर्गत सर्वेक्षणाबाबत क्षेत्रकामाबाबत कार्यक्रम आराखडा निश्चित करणे. तसेच जिल्हा कामगार कार्यालयाकडून बालकामगारांची यादी प्राप्त करून घेणे. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी (नपा/मनपा) व प्रशासकीय अधिकारी (महिला व बालविकास अधिकारी) |
| २) | स्थलांतर होणाऱ्या मुलांचे सर्वेक्षणाचे क्षेत्रकाम पूर्ण करून विहित प्रपत्र-'अ' व 'ब' मध्ये माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांना सादर करणे. | शिक्षक, मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी (न.पा./म.न.पा.) केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी व बालरक्षक इ. |
| ३) | प्रपत्र 'अ' व 'ब' मधील ग्रामीण व नागरी भागातून प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन व पडताळणी करून शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी वैध माहिती विहित प्रपत्र 'अ' व 'ब' विहित गोषवाऱ्यासह Excel मध्ये विहित नमुन्यात संगणकावर नोंदवून विहित प्रमाणपत्रासह विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करणे. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद |
| ४) | प्रपत्र 'अ' व 'ब' मधील ग्रामीण व नागरी भागातून प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन व पडताळणी करून शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांच्याकडून प्राप्त माहितीची वैधता पडताळणी करून विहित प्रपत्र 'अ' व 'ब' विहित गोषवाऱ्यांसह Excel विहित प्रमाणपत्रासह प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांना सादर करणे. | विभागीय शिक्षण उपसंचालक |

## कार्यवाही करण्याची जबाबदारी :

| अ. क्र. | विषय | जबाबदार अधिकारी | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| १) | गाव/वाडी वस्ती येथे सर्वेक्षण सुरू करणे. | सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या शाळांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका/मदतनीस हे प्रगणक म्हणून काम पाहतील. मुख्याध्यापक हे शिक्षक, अगंणवाडी सेविका/मदतनीस यांचेवर सनियंत्रण करतील. | दिलेल्या कालावधीत प्रत्यक्ष सर्वेक्षण करणे व त्याचा अहवाल दररोज वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करणे. |
| २) | तालुका स्तरावर माहिती संकलन करणे. (वयोगट – ३ ते ६ वर्षे) | बालविकास प्रकल्प अधिकारी | तालुक्यातील स्थलांतरित बालकाची माहिती विहित नमुन्यात संकलन करून जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी (जि.प.) यांचेकडे सादर करणे. |
| ३) | तालुका स्तरावर माहिती संकलन करणे. (वयोगट – ६ ते १८ वर्षे) | गटशिक्षणाधिकारी | तालुक्यातील स्थलांतरित बालकाची माहिती विहित नमुन्यात संकलन करून जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे सादर करणे. |
| ४) | जिल्हा स्तरावर माहिती संकलन करणे. (वयोगट – ६ ते १८ वर्षे) | प्रशासन अधिकारी (न.पा./म.न.पा.) | जिल्ह्यातील नागरी भागातील स्थलांतरित बालकाची माहिती विहित नमुन्यात संकलन करून जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांचेकडे सादर करणे. |
| ५) | जिल्हा स्तरावर माहिती संकलन करणे. (वयोगट – ३ ते ६ वर्षे) | जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी (जि.प.) | जिल्ह्यातील स्थलांतरित बालकाची माहिती विहित नमुन्यात संकलन करून जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे सादर करणे. |

| अ. क्र. | विषय | जबाबदार अधिकारी | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| ६) | जिल्हा स्तरावर माहिती संकलन करणे.<br>(वयोगट – ३ ते १८ वर्षे) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | जिल्ह्यातील स्थलांतरित बालकाची माहिती विहित नमुन्यात संकलन करून माहितीची वैधता पडताळून संगणकावर Excel मध्ये विहित प्रपत्रांमध्ये भरून त्यांच्या गोषवाऱ्यांसह संबधित विभागाचे शिक्षण उपसंचालक यांचेकडे सादर करणे. |
| ७) | विभाग स्तरावर माहिती संकलन करणे.<br>(वयोगट – ३ ते १८ वर्षे) | विभागीय शिक्षण उपसंचालक | जिल्ह्याकडून प्राप्त झालेली स्थलांतरित बालकाची विभागवार विहित Excel मधील माहितीची वैधता पडताळून संचालक (प्राथमिक), पुणे यांना सादर करणे. |

## विविध नियंत्रण कक्ष स्थापन करणेबाबत :

### केंद्र स्तर स्थलांतर नियंत्रक कक्ष :

सर्वेक्षण माहितीवरून स्थलांतर रोखलेले व भविष्यात स्थलांतरित होणारी मुले यांची माहिती केंद्र स्तरावर संकलित करून केंद्र स्तरावर नियंत्रक कक्ष स्थापन करणे. याचे प्रमुख म्हणून केंद्रप्रमुख सदस्य म्हणून बालरक्षक शिक्षक केंद्रांतर्गत शाळेचे मुख्याध्यापक सचिव म्हणून काम पाहतील. स्थलांतरित मुलांच्या बाबतीत करावयाच्या उपाययोजना व अंमलबजावणी याबाबत हे सर्व जबाबदार असतील.

### तालुका स्तर नियंत्रक कक्ष :

सर्वेक्षण माहितीवरून स्थलांतर रोखलेले व भविष्यात स्थलांतरित होणारी मुले यांची माहिती संकलन करावे, तसेच तालुकास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापावा. यात गटशिक्षणाधिकारी हे प्रमुख तर शिक्षण विस्तार अधिकारी (गट समन्वयक) हे सचिव म्हणून काम पाहतील. सदस्य म्हणून सर्व केंद्रप्रमुख असतील. वरील सर्व कामासोबत स्थलांतरित बालकांचे ज्या परिसरात स्थलांतर होत आहे तेथील स्थानिक नियंत्रण कक्षासोबत समन्वय साधणे हे प्रमुख व महत्त्वपूर्ण कार्य आहे.

### जिल्हा स्तर नियंत्रक :

तालुका स्तरावरील माहितीचे संकलन करून जिल्ह्याची स्थलांतराची संख्या निश्चित करावी. तालुका स्तर नियंत्रक कक्षासोबत समन्वय साधण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी या कक्षाची आहे. याचे प्रमुख म्हणून

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) हे असतील तर सचिव म्हणून उपशिक्षणाधिकारी (समग्र शिक्षा अभियान) हे असतील. सदस्य म्हणून तालुका गटशिक्षणाधिकारी हे असतील.

जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा स्तराकरिता मुख्य स्थलांतर नियंत्रक म्हणून काम पाहतील. ते वरील सर्व नियंत्रण कक्षाचे जिल्हा स्तर प्रमुख असतील.

### विभाग स्तर नियंत्रक कक्ष :

विभागीय उपसंचालक यांचे विभाग स्तरावर नियंत्रक कक्षातून माहिती संकलित करण्यात येईल. विभागाचे मुख्य विभाग नियंत्रक म्हणून विभागीय उपसंचालक हे असतील.

नियंत्रण कक्षाचे कार्य व त्याची जबाबदारी विहित वेळेत पूर्ण करावी. स्थलांतरापूर्वी, स्थलांतर होताना व स्थलांतर झाल्यानंतर या तिनही टप्प्यातील जबाबदाऱ्या विहित वेळेत पूर्ण कराव्यात. नियंत्रक अधिकारी यांनी केंद्र, तालुका, जिल्हा स्तरावर एकही विद्यार्थी शाळाबाह्य नाही अशी उपाययोजना पूर्ण झाल्यानंतर हमीपत्र द्यावे.

अशाप्रकारे, स्थलांतरित होऊन येणाऱ्या मुलांनाही नियमित शाळेत दाखल करून शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट साध्य करता येईल.

SOP मध्ये स्थलांतरित मुलांच्या बाबतीत सुचविलेल्या उपाययोजना व अंमलबजावणीची कार्यवाही यांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. स्थलांतर झालेच, तर विविध स्तरांवर नव्याने निर्माण केलेल्या समितीने उपाय म्हणून सुचविलेल्या पर्यायांचे पालन करावे.

◈◈◈

## शाळाबाह्य अनियमित व स्थलांतरित मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेसाठी
## मिशन झिरो ड्रॉप आऊट मोहीम : जुलै २०२२

| अ. क्र. | जिल्हा/विभाग | ३ ते १८ वर्षे वयोगटातील आढळलेली शाळाबाह्य बालके | शिक्षणाच्या प्रवाहात आणलेली बालके |
|---|---|---|---|
| १. | बृहन्मुंबई | ३१६ | ३१६ |
| २. | मुंबई उपनगर | ६०७ | ५५६ |
| ३. | ठाणे | १,२८० | १,२८० |
| ४. | रायगड | ७८ | ७८ |
| ५. | पालघर | १,००६ | १००४ |
| ६. | पुणे | ७६५ | ७१५ |
| ७. | अहमदनगर | २४२ | २१७ |
| ८. | सोलापूर | ९२ | ९२ |
| ९. | कोल्हापूर | १० | १० |
| १०. | सातारा | ५९ | ५९ |
| ११. | सांगली | ३९ | ३७ |
| १२. | रत्नागिरी | ४ | ४ |
| १३. | सिंधुदुर्ग | ४४ | ४४ |
| १४. | नाशिक | ४१७ | ४१७ |
| १५. | धुळे | ६२४ | ६२३ |
| १६. | नंदुरबार | ३२५ | ३२५ |
| १७. | जळगाव | ३२७ | ३२७ |
| १८. | औरंगाबाद | १,४११ | १,४११ |
| १९. | जालना | १४६ | १४६ |
| २०. | बीड | १६३ | १६३ |
| २१. | परभणी | १११ | १०२ |

| अ. क्र. | जिल्हा/विभाग | ३ ते १८ वर्षे वयोगटातील आढळलेली शाळाबाह्य बालके | शिक्षणाच्या प्रवाहात आणलेली बालके |
|---|---|---|---|
| २२. | हिंगोली | १०६ | १०६ |
| २३. | लातूर | ११ | ११ |
| २४. | उस्मानाबाद | ५७ | ५७ |
| २५. | नांदेड | १८ | १८ |
| २६. | अमरावती | २९ | २७ |
| २७. | अकोला | २४३ | २४३ |
| २८. | वाशिम | ६ | ६ |
| २९. | यवतमाळ | ५३ | ५१ |
| ३०. | बुलढाणा | २१० | ९४ |
| ३१. | नागपूर | १२६ | १२६ |
| ३२. | भंडारा | १८ | १७ |
| ३३. | चंद्रपूर | २१ | २१ |
| ३४. | गोंदिया | ५१ | ४६ |
| ३५. | वर्धा | ६८ | ६८ |
| ३६. | गडचिरोली | २२२ | १८७ |
| | **एकूण** | **९,३०५** | **९,००४** |

## शासनाने याबाबत काढलेले विविध शासन निर्णय/परिपत्रके

| अ. क्र. | शासन निर्णय/परिपत्रके | विषय |
|---|---|---|
| १. | बालमजुरी कायदा (प्रतिबंध व विनियम १९८६) | १) १४ वर्ष वयापर्यंतच्या मूलांकडून मजुरी करून न घेण्याबाबतची तरतूद उपलब्ध आहे. |
| २. | भारत सरकार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २००९.<br>दि. २६/०८/२००९ | १) ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याची तरतूद आहे.<br>२) ६ वर्षापेक्षा जास्त वय असणाऱ्या; परंतु शाळेत प्रवेशीत नसलेल्या मुलास त्याच्या वयानुरूप शाळेत प्रवेश देण्याची तरतूद उपलब्ध आहे.<br>३) इयत्ता ८ वी पर्यंतच्या प्रत्येक मुलात किमान क्षमता विकसित करणे. |
| ३. | महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११.<br>दि. ११/१०/२०११ | १) बालकाच्या निवासस्थानापासून इ. १ ली ते ५ वी करिता १ कि.मी. अंतराच्या आतील व ६ ते ११ वर्ष वयाची किमान २० बालके उपलब्ध असेल तेथे शाळा स्थापन करण्याची तरतूद.<br>२) इ. ६ वी ते ८ वी साठी ३ कि.मी. च्या आत व इ. ५ वी मध्ये २० बालके उपलब्ध असलेली असे आहे.<br>३) स्थानिक प्रशासन अथवा राज्य शासनाकडून ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांचे प्रमाण लक्षात घेऊन एकापेक्षा जास्त नजीकच्या शाळा स्थापन करणे/नेमून देण्याची तरतूद आहे.<br>४) शाळा व्यवस्थापन समिती, शाळा/शिक्षक यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.<br>५) बालकांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी राज्य सल्लागार परिषद घटित करण्याची तरतूद आहे. |
| ४. | शासन निर्णय क्रमांक : आरटीई २०१३ प्र. क्र. ८/१३ प्रशि-१<br>दि. २८ मार्च, २०१३ | १) शाळाबाह्य मुलांना नियमित शाळेत दाखल करणे आणि उपस्थिती टिकवून ठेवणे यासाठीच्या उपाययोजना.<br>२) प्रयेक मूल शाळेत प्रवेशित झाले पाहिजे.<br>३) सदर उद्दिष्ट पूर्ततेसाठी संगणकीय प्रणालीचा वापर करण्याची तरतूद उपलब्ध आहे.<br>४) शिक्षण संचालकांनी दर दोन महिन्यांनी अहवाल शासनास सदर करण्याचे निर्देश आहेत. |

| अ. क्र. | शासन निर्णय/परिपत्रके | विषय |
|---|---|---|
| ५. | शासन निर्णय क्रमांक : ओएससी ४४१५ (१०२/१५) - एस.डी.४, दि. २० मे, २०१५ | १) राज्यातील शाळाबाह्य बालकांचे एक दिवसीय सार्वजनिक सर्वेक्षण.<br>२) सर्वेक्षणाचे व्यापक प्रबोधन होण्यासाठी समाजातील सर्व घटकांचा वापर करण्यात आला. सोशल मीडियाचादेखील वापर करण्यात आला.<br>३) वयोगट ६ ते १४ वर्षे मधील प्रत्येक मूल शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी विशेष मोहीम. |
| ६. | शासन परिपत्रक क्र. ओएससी- ४४१६ (३०६/१६)/एसडी-४, दि. ३ नोव्हेंबर, २०१६ | १) स्थलांतरित होणाऱ्या व शाळेत अनियमितरीत्या गैरहजर राहणाऱ्या मुलांना शाळेत नियमित करण्याबाबत.<br>२) यामध्ये राज्यांतर्गत स्थलांतरण, इतर राज्यातून होणारे स्थलांतरण, शाळेच्या परिसरात राहून सुद्धा अनियमित राहणारी मुले या सर्व मुलांना शाळेत नियमित करण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.<br>३) शाळेच्या पटावर असलेल्या सर्व मुलांच्या १० च्या गटात वर्ग शिक्षकांसोबत सेल्फी घेऊन सरल पोर्टल मध्ये अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. |
| ७. | शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क.(१५०/१६) एसडी-६, दि. ०३ नोव्हेंबर, २०१६ | १) शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेत आणणे व नियमित करणे यासाठी मोहीम राबविण्यात आली. |
| ८. | शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी.-६, दि. ९ जानेवारी, २०१७ | १) शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेत आणणे व नियमित करणे यासाठी मोहीम राबविण्यात आली.<br>२) जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम.<br>३) यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याची तरतूद आहे. |
| ९. | शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१ प्र.क्र.२१/एसडी-४, दि. २३ फेब्रुवारी, २०२१ | १) शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेसाठी विशेष शोध मोहीम राबविण्याची तरतूद आहे.<br>२) दि. २४/०२/२०२१ ते दि. १६/०३/२०२१ या कालावधीत उपक्रम राबविण्यात आला.<br>३) शोध मोहिमेबाबत विविध माध्यमांद्वारे व्यापक जनप्रबोधन करण्यात आले. |

| अ. क्र. | शासन निर्णय / परिपत्रके | विषय |
|---|---|---|
| १०. | शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०२२/प्र. क्र. १२० एसडी–४,<br>दि. २३ जून २०२२ | १) शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेसाठी 'मिशन झिरो ड्रॉप आऊट' (Mission Zero Drop Out) राबविण्याबाबत.<br>२) दि. ०५/०७/२०२२ ते दि. २०/०७/२०२२ या कालावधीत उपक्रम राबविण्यात आला.<br>३) महिला व बालविकास अंतर्गत बालग्रह निरीक्षण ग्रह/विशेष दत्तक संस्था यांचाही समावेश करण्यात आला.<br>४) शोध मोहिमेबाबत विविध माध्यमांद्वारे व्यापक जनप्रबोधन करण्यात आले. |
| ११. | शासन परिपत्रक क्र.<br>शासन परिपत्रक क्र. संकीर्ण–२०२२/ प्र.क्र. ९२/एसडी –४,<br>दि. १९ जुलै, २०२२ | १) शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे व त्यांना शाळेत दाखल करून घेणे.<br>२) यासंबंधी पालकांना मार्गदर्शन करणे.<br>३) शाळाबाह्य विद्यार्थ्यांशी संबंधित विषयावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करणेबाबत. |

# श्रेयनामावली

| अ. क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १) | रत्नप्रभा भालेराव | प्राचार्य | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा. |
| २) | डॉ. विद्या बोरसे | अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ३) | सुरेखा दरवडे | से. नि. अधिव्याख्याता | समता विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ४) | सलील वाघमारे | से. नि. अधीक्षक | समता विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ५) | रोहिणी लोखंडे | सहशिक्षक | जिल्हा परिषद शाळा नांदूर, ता. दौंड, जि. पुणे. |
| ६) | सुनिता काटम | सहशिक्षक | जिल्हा परिषद शाळा वडगाव बांदे, ता. दौंड, जि. पुणे. |

